आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

होय..आम्ही घेतोय आपल्या डोळ्यांची काळजी..
ऑप्टोमेट्रिस्टकडून डोळ्यांची दररोज मोफत तपासणी
एकदा अवश्य भेट द्या व खात्री करा
▪ नंबरचा चष्मा फक्त रु. 299 रुपयात
▪ प्रोग्रेसिव्ह चष्मा फक्त रु. 900 रुपयात
▪ ब्लूकट चष्मा फक्त रु. 500 रुपयात
अहमदनगरचे सुप्रसिध्द
अंजली चष्मावाला
पत्ता : शिवशक्ती कॉम्प्लेक्स, पटेल मेडिकलजवळ, चितळेरोड, अहमदनगर, मो : 8796824353

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. १५.०७.२०२४ | अंक नं. ११५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# आधी शहरातील रस्ते तर दुरुस्त करा मग वाहनधारकांकडून पार्किंगसाठीचे पैसे घ्या

## ‘पे ॲण्ड पार्क’च्या प्रस्तावाला विरोध करत महाविकास आघाडीचे महापालिका आयुक्तांना निवेदन

नगर – अहमदनगर महानगरपालिकेने नगर शहरात ३६ रस्ते आणि जागांवर पे अँड पार्क सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे. या प्रस्तावना नगर शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने विरोध दर्शवला आहे. अगोदर नगर शहरातले रस्ते व्यवस्थित दुरुस्त करा ते मोठे आणि प्रशस्त करा आणि मग पे अँड पार्क लागू करा असे त्यांनी म्हटले आहे शिवसेना गटाचे युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड यांनी याबाबत मनपा आयुक्तांना निवेदन दिले आहे.

पार्किंगची समस्या नगर शहरात खूपच बिकट आहे. चितळे रोड, कापड बाजार, माळीवाडा या रस्त्यावर चार चाकी वाहन लावण्यास जागा नाही. दुचाकी गाड्या बेशिस्तपणे रस्त्यावर पार्क केलेले असतात. ही समस्या सोडवण्यासाठी पार्किंगसाठी शुल्क आकारणे हा उपाय होऊ शकत नाही.

मनपा पार्किंग शुल्क आकारणीचा ठेका खाजगी ठेकेदाराला देत आहे. याद्वारे मनपाला पाच वर्षात २१ लाख रुपये मिळणार आहे असा दावा कागदोपत्री केला जातो आहे. नगर शहर आणि सावेडी भागातील विविध रस्त्यांवर काही ठिकाणी नो हॉकर्स झोन लागू करून त्या ठिकाणी शुल्क घेऊन पार्किंग सुरू करणार आहे.

एका तासाला टू व्हीलरला पाच रुपये आणि फोर व्हीलरला दहा रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. नगर शहरांमध्ये अनेक ठिकाणी बेकायदेशीरपणे स्थानिक गुंड पार्किंग सेवा देऊन शुल्क घेतात. आता अधिकृतपणे ठेका देऊन वाहन चालकांकडून करण्यात येणारी शुल्क आकारणी हा मनपाने लादलेला जिझिया कर आहे असा आरोप शिवसेनेने केला आहे. मनपाने शुल्का आकारणी करू नये, ठराव विखंडित करावे अन्यथा शिवसेना या ठेकेदाराला पार्किंग शुल्क आकारणी करू देणार नाही असा इशारा देण्यात येत आहे.

यावेळी गिरीश जाधव, बाळासाहेब बोराटे, युवासेना जिल्हाप्रमुख प्रशांत भाले, उपशहर प्रमुख मुन्ना भिंगारदिवे, सुमित धेंड, गुड्डू भालेराव, गौरव ढोणे, जेम्स आल्हाट, उमेश काळे, आनंद राठोड, अक्षय नागपूरे, व इतर युवासैनिक शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

ठराव राज्य सरकारकडे रद्द करण्यासाठी पाठवावे व फेरनिविदा करण्यात यावी, अशी मागणी शहरप्रमुख संभाजी कदम यांनी केली आहे.

मनपाने पे अँड पार्क साठी जे टेंडर केले आहे ते अत्यल्प रकमेचे आहेत. प्रत्यक्षामध्ये त्या ठिकाणी पुढील पाच ते सात वर्षांमध्ये कोट्यावधी *(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Indoor Plants for your Home!
Get a Plant Today!
Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर.
(0241) 2343896/2341196

११ वे । पुण्यस्मरण ।

स्व. पै. सहादूजी अनाजी गुंजाळ (तात्या)
स्व. दि. १६/०७/२०१३ (आखाडा वस्ताद)
ज्योत अनंतात विलीन झाली,
स्मृती आठवणींना दाटून आली..
भाव सुमनांची ओंजळ भरुनी,
वाहतो आम्ही श्रद्धांजली..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..
– दुःखांकित –
चंद्रकांत माणिकराव खेत्रे (कांताशेठ)
(कांदा, बटाटा, भाजीपाला, आडते कमिशन एजंट मार्केटयार्ड, अ.नगर)
(गाळा नं.२, मार्केटयार्ड, गाळा नं.२३१, नेप्ती कांदा मार्केट, अ.नगर)
बाळासाहेब माणिकराव खेत्रे । अमोल चंद्रकांत खेत्रे
महेश चंद्रकांत खेत्रे । पद्माकर कोंडिराम खेत्रे
सागर अरुण खेत्रे । युवराज अरुण खेत्रे
समस्त खेत्रे परिवार, अ.नगर

SONI TILES Since 1985
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

Career DISHA
GET READY FOR YOUR JOB
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST | CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP | WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

MEGA BLOOD DONATION CAMP 2024
Organised by
AHMEDNAGAR MOBILE RETAILERS ASSOCIATION
Supported by
संग्रामभैय्या जगताप सोशल फाउंडेशन | I ❤ नगर
Co-Supported by
INDUS PAVILION
महा रक्तदान शिबिर
रक्ताने माणुसकीचे नवे नाते जोडणाऱ्या या उपक्रमात
तुम्हीही सहभागी व्हा आणि आपल्या मित्र परिवारालाही
रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित करा.
रक्तदान जीवनदान
16 जुलै 2024, मंगळवार
सकाळी 07.00 ते सायं. 08.00 वा.
नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर.
अधिक माहितीसाठी संपर्क 88 3060 1964
टीप : दि. 16 जुलै रोजी, अहिल्यानगर शहरातील सर्व मोबाईल दुकाने बंद राहतील.

संपूर्ण स्टेशनरी वस्तूंमध्ये १०% सूट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी | होलसेल ॲण्ड रिटेलर एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाइझड गिफ्ट ॲण्ड टॉईज
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर
मो : 9325329061/ 9373417113

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## अमृतास कोण घालील भोजन? संत बहिणाई

अमृतास कोण घालील भोजन? किंवा पांघरुण गगना त्या?... साक्षात जगद्गुरु तुकाराम महाराजांनी निद्रावस्थेत दृष्टांत लाभलेल्या संत बहिणाबाईंचं अवघं जीवन कादंबरीहून अद्भूत आहे. कुऱ्हाडीने वृक्षावर तिरपा घाव घालावा नि त्या घावातूनही नवी पालवी फुटावी, तशी सांसारिक वनवास प्राक्तनात येऊनही संत तुकाराम यांच्या कृपादृष्टीने पुनर्जन्म मिळालेली संत बहिणाई (सन १६६८ ते १७००) हे संत मांदियाळीतील आश्चर्य म्हणावे लागेल.

वयाने २७ वर्षाचे अंतर असलेल्या व अहोरात्र छळणाऱ्या बिजवर पतीशी संसार करतांना भजन-किर्तने यांचा नामगजर कानी पडल्याने त्यांना परमार्थाची ओढ लागली. वारकरी संप्रदायाच्या भव्य 'इमारत' निर्मितीबद्दल त्यांचा अभंग खूपच विख्यात व महत्त्वाचा आहे.

वाचनीय मननीय
प्रेरणादायी
अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

संतकृपा झाली । इमारत फळा आली । ज्ञानदेवे रचिला पाया । उभारले देवालया ।। नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार । जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।। तुका झालासे कळश। भजन करा सावकाश । बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरुपणा केले बोजा ।।

विलक्षण तीव्र बुद्धीमत्ता, परिस्थितीने मिळवलेले आत्मबळ व गुरुनिष्ठेने बहिणाईने त्या त्या संतांचे योगदान चित्रित केले आहे. (संतवसंत)








महसूल कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काम बंद आंदोलन केले त्यामुळे कार्यालयात शुकशुकाट असल्याचे छायाचित्रात दिसत आहे.

# महसूल कर्मचारी संघटनेचे नगरमध्ये काम बंद आंदोलन

नगर - विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र आंधळे यांच्या नेतृत्वाखाली काम बंद आंदोलन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र संघटनेचे उपाध्यक्ष अक्षय फलके, जिल्हा संघटनेचे सरचिटणीस स्वप्निल फलके, उपाध्यक्ष अशोक मासाळ, उपाध्यक्ष संतोष झाडे, मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, अशोक मासाळ, अक्षय फलके, महिला अध्यक्ष वंदना नेटके, दिगंबर करपे, नितीन मुळे, राजेंद्र लाड, शेखर साळुंखे, भरत गोरे, महेश म्हस्के, शारदा आवटी, रूपाली बधे, अजय ढसाळ, ज्ञानेश्वर खोलम, दीपक चन्ने, संतोष धोंगडे, शंकर जगताप, आप्पा खरात, गणेश कोळकर, वैभव साळवे, कृती कदम, माधवी पुंडे, स्वाती फुलारे, सीमा आरगडे, प्रिया धोत्रे, सुषमा उमाप, रासकर, बेल्हेकर, बेंद्रे मॅडम, डावरे मॅडम, ठोंबरे, दातरंगे आदीसह महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध दांगट समितीच्या अहवालातील शिफारसी प्रमाणे कोणत्याही संवर्गातील कर्मचारी कपात न करता लागू करावा व अव्वल कारकून मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात तात्काळ पदोन्नती देऊन आदेश निर्गमित करण्यात यावे, महसूल विभागाचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करून पुरवठा विभागातील पदभरती मुळे रिक्त होणारे महसूल कर्मचारी यांना महसूल विभागात सामावून घेण्यात यावे, वेतन देयके उणे प्राधिकारपत्रावर वाढवण्याबाबत तात्काळ शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा, महसूल सहाय्यकांचा ग्रेड पे १९०० वरून २४०० करण्यात यावा, तसेच महसूल सहाय्यक व तलाठी यांना सेवा अंतर्गत एकसमान परीक्षा पद्धती लागू करण्यात यावी, महाराष्ट्र शासन वित्त विभाग याची अधिसूचना ३ फेब्रुवारी २०२३ नुसार तात्काळ अव्वल कारकून यांची वेतन निश्चिती करण्यात यावी, महसूल सहाय्यकांची सेवा जेष्ठता यादी केवळ महाराष्ट्र महसूल अहर्ता परीक्षा नियम १९९९ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात यावी, तसेच महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी यांची सेवा पुस्तिका लेखा अधिकारी वेतन पडताळणी पथका ऐवजी समक्ष असलेल्या महसूल विभागातील नियुक्त लेखा अधिकारी यांचे वेतन पडताळणीचे अधिकारी मार्फत करण्यात यावी, अव्वल कारकून या सवर्गाचे पदनाम बदलून सहाय्यक महसूल अधिकारी असे करण्यात यावे, नायब तहसीलदार संवर्गाचा, ग्रेड वेतन ४८०० करण्यात यावा, अव्वल कारकून यांना मंडळ अधिकारी पदावर अदलाबदली धोरणास नुसार पदस्थापना देण्यात यावी, नायब तहसीलदार पदासाठी अव्वल कारकून मंडळ अधिकारी यांच्याकरिता पदोन्नती विभागीय परीक्षा सरळ सेवा करण्यात यावी, चतुर्थ श्रेणी शिपाई कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत असताना तलाठी संवर्गामध्ये २५% पदोन्नती देण्यात यावी, कोतवाल पदांना चतुर्थ श्रेणी दर्जा देण्यात यावा, कोतवाल पदोन्नती कोटा वाढवण्यात यावे.

# गुन्हेगारी पार्श्वभूमीचे ४६९ जण २ दिवस नगर शहरातून तडीपार

## मोहरमच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून प्रतिबंधात्मक कारवाई

नगर - मोहरमच्या पार्श्वभूमीवर नगर शहरात १६ जुलै व १७ जुलै रोजी कत्तलची रात्र व सवारी विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच १७ जुलै रोजी आषाढी एकादशी साजरी होणार आहे. शहरात मागील काही महिन्यांत तणाव निर्माण करणार्या घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने दक्षतेचा भाग म्हणून प्रतिबंधात्मक कारवाया सुरू केल्या आहेत. नगर शहर व भिंगार परिसरातील तब्बल ४६९ गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना दोन दिवस तडीपार करण्यात आल्याची माहिती उपअधीक्षक अमोल भारती यांनी दिली.

नगर शहरात मागील काही महिन्यांपासून कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल, तणाव निर्माण होईल, अशा घटना घडलेल्या आहेत. त्यातून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे देखील दाखल आहेत. या घटनांसंदर्भात विधानसभेच्या पावसाळी अधिवेशातही प्रश्न उपस्थित झाला होता. आता १६ जुलै व १७ जुलै रोजी मोहरमनिमित्त शहरातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. १७ जुलै रोजी आषाढी एकादशी साजरी होणार असून त्यानिमित्त ठिकठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी खबरदारी म्हणून नगर शहर पोलीस प्रशासनाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांवर कारवाया सुरू केल्या आहेत. नगर शहर विभागातील कोतवाली, तोफखाना व भिंगार पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तब्बल ४६९ जणांना १६ व १७ जुलै अशा दोन दिवसांसाठी शहरातून तडीपार करण्यात आले आहे. भारतीय नागरी संरक्षण कायदा कलम १६२ (२) अंतर्गत ही कारवाई करण्यात आल्याचे उपअधीक्षक भारती यांनी सांगितले.

दरम्यान, हद्दपार करण्यात आलेले गुन्हेगार हद्दपार कालावधीत शहरात आढळून येतात. अशा गुन्हेगारांवर पोलिसांचा वॉच राहणार आहे. हद्दपार कालावधीत नगर शहरात आढळून आल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. सोशल मीडियावर पोस्ट टाकून तेढ निर्माण करण्याचा प्रयत्नही यापूर्वी झाला आहे. अशा तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट टाकणाऱ्या व त्या व्हायरल करणाऱ्यावरही सायबर पोलिसांचे लक्ष असणार आहे.नगर शहर उपविभागीय पोलीस उपअधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रात येणार्या कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १००, तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १८० व भिंगार पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १८९ अशा तब्बल ४६९ जणांना १६ व १७ जुलै अशा दोन दिवसांसाठी शहरातून तडीपार करण्यात आले आहे.

# बसस्थानकातून महिलेच्या पर्सची चोरी; दागिन्यांसह रोकड लंपास

नगर - नगर शहरातील स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात बस मध्ये चढत असताना झालेल्या गर्दीचा फायदा घेत एका महिलेच्या बॅग मधून सोन्याचे दागिने ठेवलेली पर्स अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना शनिवारी (दि.१३) सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडली आहे.

याबाबत निशा दौलतराव लाड (रा. अंमळनेर, जळगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी लाड या गावी जाण्यासाठी पुणे बसस्थानकावर बस मध्ये चढत असताना तेथे झालेल्या गर्दीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या बॅग मधून सोन्याचे मिनीगंठण, कर्णफुले, कुडकाचे जोड तसेच ३९ हजारांची रोकड असा ७८ हजार रुपयांचा ऐवज ठेवलेली पर्स चोरून नेली. चोरीची घटना लक्षात आल्यावर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नगरच्या बसस्थानकात तसेच बस प्रवासात गेल्या काही दिवसांमध्ये पाकिट चोरी, दागिने, पर्स, चोरीच्या घटना वाढल्या आहेत. नगर शहर हे उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ मराठवाड्याला जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असल्याने शहरातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रवाशांची जुन्या बसस्थानकात तर परजिल्ह्यात जाणाऱ्या प्रवाशांची पुणे बसस्थानकात दररोज मोठी गर्दी होत असते.

यात विशेषतः महिलांना एस.टी. बस प्रवाशी भाड्यात राज्य सरकारने सवलत जाहीर केलेली असल्याने एस टी बस प्रवासासाठी महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांची गर्दी वाढण्याबरोबरच या गर्दीत बसमध्ये चढताना, उतरताना महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्स मधील दागिने, पैसे चोरी जाण्याचे प्रमाणही वाढले आहे. चोरटे गर्दीत मिसळून हातसफाई करत आहेत. गेल्या काही दिवसांत या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने नगर मधील बस स्थानके चोरट्यांचे अड्डे बनले असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

## बुऱ्हाणनगरमध्ये युवकाची गळफास घेवून आत्महत्या

नगर - एका २२ वर्षीय युवकाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथे शनिवारी (दि.१३) रात्री घडली. संदीप लहानू कर्डिले (रा. बुऱ्हाणनगर, ता.नगर) असे मयत युवकाचे नव आहे.

संदीप यांनी राहत्या घरात गळफास घेतल्याची बाब त्याच्या कुटुंबियांच्या निदर्शनास आल्यावर त्याला बेशुद्धावस्थेत त्याच्या नातेवाईकांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात शनिवारी रात्री ९ च्या सुमारास दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. ढगे यांनी त्यास मयत घोषित केले. याबाबतची खबर भिंगार कम्प पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## छबुबाई नागरगोजे यांचे निधन

नगर - येथील सौ. छबुबाई नागरगोजे (वय ६३) यांचे १३ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, २ मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर नागापूर अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी एमआयडीसीतील उद्योजक, अधिकारी व कामगार उपस्थित होते.



सौ. छबुबाई नागरगोजे यांना धार्मिक कार्याची विशेष आवड होती. एमआयडीसीतील अंबिका उद्योग समुहाचे संचालक लिंबाशेठ नागरगोजे यांच्या पत्नी होत.



पे अँड पार्कच्या प्रस्तावाला विरोध करत महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना शिवसेनेचे विक्रम राठोड. समवेत भगवान फुलसौंदर, किरण काळे, संभाजी कदम, अभिषेक कळमकर, बाळासाहेब बोराटे, गौरव ढोणे आदी.

# आधी शहरातील रस्ते तर दुरुस्त करा मग वाहनधारकांकडून पार्किंगसाठीचे पैसे घ्या

*(पान १ वरून)*

रुपयांची वसुली या माध्यमातून केली जाणार आहे, असे माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी म्हटले आहे.

शहराच्या विद्यमान आम दारांकडे नगरच्या मनपाचा रिमोट कंट्रोल आहे. या माध्यमातून आपल्या लोकांचे खिसे भरणे, त्यांना गडगंज करणे हा त्यांचा अजेंडा आहे. मात्र त्यासाठी शहरातील सामान्य व्यापारी आणि नगरकर नागरिकांना वेठीस धरण्याचा त्यांचा कुटील डाव आहे. पंधरा दिवसांच्या आत याबाबतचा निर्णय मागे घेतला नाही तर महाविकास आघाडीच्या वतीने रस्त्यावर उतरत व्यापारी नागरिकांचा भव्य मोर्चा आम्ही काढू, असा इशारा काँग्रेस शहर अध्यक्ष किरण काळे यांनी दिला आहे.

नागरिकांना व व्यापाऱ्यांना त्रास होऊ देणार नाही यासाठी रस्त्यावर उतरू, असे माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी म्हटले आहे.

# मोहरम चादर मिरवणुकीत डीजेचा दणदणाट अन आवेशपूर्ण घोषणा

## यंग पार्ट्यांचे अध्यक्ष व डीजे चालक अशा १२ जणांवर गुन्हे दाखल

नगर - मोहरमनिमित्त काढण्यात आलेल्या चादर मिरवणुकीत डीजे वाजवून ध्वनी प्रदूषण केल्याप्रकरणी तसेच आवेशपूर्ण घोषणा दिल्या प्रकरणी मंडळ अध्यक्ष, डीजे चालक/ मालक अशा १२ जणांविरूध्द कोतवाली पोलिस ठाण्यात २ आणि तोफखाना पोलिस ठाण्यात १ असे ३ वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीस अंमलदार मच्छिंद्र पांढरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चादर मंडळाचे अध्यक्ष अजहर रहेमान शेख (रा. बाबा बंगाली) व डीजे चालक/ मालक अदनान मुबारक शेख (रा. हांडेवाडी, पुणे), के. एम. बॉईज ग्रुप कारी मस्जिद मंडळाचे अध्यक्ष असरार अरिफ खान (रा. कारी मस्जिद) व डीजे चालक/ मालक चाऊस इम्रान शेख (रा. रविवार पेठ, पुणे), टिळक रस्ता यंग पार्टी मंडळाचे अध्यक्ष नादीर बाबा शेख (रा. टिळक रस्ता) व डीजे चालक/ मालक राजम हेम्मद नजीर अकतार (रा. लक्ष्मीनगर, भिंगार) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. नगर शहरात सध्या मोहरम उत्सव सुरू असून या निमित्ताने चादर मिरवणुकीचे आयोजन केले जात आहे. शुक्रवारी (दि.१२) सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत नगर शहरातील मिरवणुक मार्गावरून चादर मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

या मिरवणुकीत तीन मंडळ सहभागी झाले होते. त्यांनी या मिरवणुकीत डीजे वाजवून ध्वनी प्रदुषण केले. याबाबत त्यांना बंदोबस्तावरील पोलिसांनी वारंवार आवाज कमी करण्याच्या सूचना करून देखील त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. कर्णकर्कश आवाजात गाणी लावून व आवेशपूर्ण घोषणाबाजी करून सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी क्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटीं व शर्तीचे उल्लंघन केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दुसरी फिर्याद स. फौ. राजेंद्र गर्गे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यावरून कासीम इब्राहीम शेख, डीजे मालक मयुरेश लक्ष्मण पोटे (रा.पुणे), मुन्तजीर फारुख खान (रा. पाचलिंब गल्ली), इक्बाल मेहमूद शेख (रा. आनंदनगर) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर तिसरी फिर्याद पो.ना. तन्वीर शेख यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात दिली आहे.

या फिर्यादीवरून अमीर सलीम शेख (रा. नगर) व डीजे मालक अमीर गुलाब मुलाणी (रा. केडगाव) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मारुतीराव लवांडे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - तिसगाव (ता. पाथर्डी) येथील सेवानिवृत्त जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक मारुतीराव किसनराव लवांडे (वय ९०) यांचे १० जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी किसनराव लवांडे, प्रा. आदिनाथ लवांडे व लताबाई रुस्तुम देशमुख यांचे ते वडील होत. दिवंगत मारुती लवांडे यांनी बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात सेवा बजावताना आदर्श शिक्षक म्हणून लौकिक मिळवला होता.



## राजेंद्र (बापू) गागरे यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर - येथील मुळा - प्रवराचे माजी कर्मचारी राजेंद्र (बापू) बाबाजी गागरे (वय ५८) यांचे १४ जुलै रोजी रात्री ८ वा. हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, सून, पुतणे, जावई नातवंडे असा परिवार आहे. मुळा - प्रवराचे माजी कर्मचारी विलासराव गागरे व डॉ.संजय गागरे यांचे बंधू, डॉ. स्नेहा ठिकेकर व रोहन (बंटी) गागरे यांचे वडील, अमित व शुभम गागरे यांचे चुलते होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजाराची तेजीत सुरुवात

मुंबई - पुढील आठवड्यात अर्थमंत्री निर्मला सीतारामन मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पाहिला अर्थसंकल्प सादर करणार आहेत. त्यापूर्वी घसरणीचे सत्र मोडून देशांतर्गत शेअर बाजार रिकव्हरी म ेडमध्ये आल्याचे दिसत आहे. आठवड्याच्या पहिल्या व्यवहार दिवशी सोमवारी (दि.१५) शेअर मार्केटची तेजीसह सुरुवात झाली आहे. शेअर मार्केटच्या प्री-ओपनिंग सत्रात सेन्सेक्स आणि निफ्टीने मुसंडी मारली आहे.

भारतीय शेअर मार्केटच्या निफ्टीने सोमवारी ताबडतोड सुरुवात केली. गेल्या आठवड्यात देशांतर्गत मार्केटमध्ये बरेच चढ-उतार पाहायला मिळाले होते तर, अर्थसंकल्पाआधीच्या आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सकारात्मक ओपनिंगमध्ये गुंतवणूकदारांचा जीव भांड्यात पडला असेल. या काळात एनएसई निफ्टीने २४,५८७.६० अंकांवर सुरुवात केली तर गेल्या आठवड्यात निर्देशांकाने २४,५९२.२० अंकांच्या उच्चांकावर भरारी घेतली होती. दुसरीकडे, बीएसई सेन्सेक्स १६७.२३ अंकांची उसळी घेऊन ८०,६८६.५८ अंकांवर पोहोचला असून निर्देशांकाने ८०,६०० अंकांचा टप्पा ओलांडला.

बाजार उघडताच एच सी एल टेक्नॉलॉजीज, अल्ट्राटेक सिमेंट, श्रीराम फायनान्स, ओएनजीसी आणि टेक महिंद्रा निफ्टीवर वाढीसह व्यवहार करत होते तर एशियन पेंट्स, भारती एअरटेल, टाटा स्टील, कोल इंडिया आणि एचडीएफसी लाईफ यांना घसरणीचा सामना करावा लागला.

# भरदिवसा घर फोडून दागिने व रोकड पळविली

## अज्ञात चोरट्यांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील भोरवाडी शिवारात एका नोकरदार व्यक्तीचे घर चोरट्यांनी दिवसा फोडले व सुमारे तीन तोळ्याच्या सोन्याच्या दागिन्यासह ५६ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. शनिवारी (दि.१३) दुपारी साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दत्तात्रय नारायण भोर (वय ३५, रा. भोरवाडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. शनिवारी दुपारी भोर यांचे घर बंद होते. दुपारी साडेबाराच्या सुमारास चोरट्यांनी भोर यांच्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेले अडीच तोळ्याचे सोनसाखळीचे गंठण, एक ग्रॅमचा सोन्याचा ओम, एक ग्रॅमच्या दोन कानातील बाळ्या व एक ग्रॅमची नाकातील नथ असा सुमारे ५६ हजारांचा ऐवज चोरून नेला.

दरम्यान चोरी करण्यासाठी आलेल्या चोरट्यांकडे एमएच २३ पासिंग असलेली (पूर्ण नंबर नाही) दुचाकी असल्याचे स्थानिक नागरिकांनी पाहिले. सदरचा प्रकार भोर यांना कळताच त्यांनी नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली.

भोर यांच्या फिर्यादीवरून सायंकाळी गुन्हा दाखल करून घेतला असून अधिक तपास महिला पोलीस अंमलदार कविता हरीश्चंद्रे करत आहेत.

# एटीएम कार्डची अदलाबदल करून पैसे काढत महिलेची ४० हजारांची फसवणूक

नगर - एटीएम मशीन मधून पैसे काढण्यासाठी गेलेल्या वृद्ध महिलेचा विश्वास संपादन करून हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदल करत खात्यातून ४० हजार रुपये काढून घेत त्या महिलेची फसवणूक केल्याची घटना नगर शहरातील मार्केट यार्ड चौकाजवळ असलेल्या नेवासकर पेट्रोल पंपाच्या आवारात असलेल्या स्टेट बँकेच्या एटीएम मध्ये शनिवारी (दि.१३) दुपारी घडली.

फसवणूकीची ही घटना लक्षात आल्यावर सौ. महारुख बिकाणी श्रॉफ (वय ६५, रा. भाग्योदय कॉलनी, दमानिया बंगल्यामागे, जामखेड रोड) यांनी रविवारी (दि.१४) दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. फिर्यादी या शनिवारी दुपारी २ च्या सुमारास नेवासकर पेट्रोल पंपाच्या आवारात असलेल्या स्टेट बँकेच्या एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या. तेथे त्यांना एटीएम मधून पैसे काढताना अडचण आली.

त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या एका अनोळखी इसमाने त्यांना मदत करण्याचा बहाणा करत त्यांच्या कडील एटीएम कार्ड घेतले. त्यांना दुसरे कार्ड देवून त्यांच्या कार्डद्वारे त्यांच्या खात्यातून ४० हजार रुपये काढले. ही बाब रविवारी (दि.१४) त्यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.





आनंदधाममध्ये श्रमणसंघीय उपप्रवर्तक श्री श्रृतमुनीजी म.सा. यांच्या आध्यात्मिक चातुर्मास प्रवेशप्रसंगी त्यांचे स्वागत करताना कलश व आगमग्रंथ घेतलेल्या महिला, पाठशाळेतील मुली. दुसऱ्या छायाचित्रात मुनीजींचे स्वागत करताना हस्तीमल मुनोत, आनंदराव मुनोत, सतीश लोढा, संतोष गांधी, अशोक पारख, नितीन कटारिया, संजय चोपडा आदी. तिसऱ्या छायाचित्रात उपनगरातील उपस्थित समाजातील विविध क्षेत्रातील लोक व महिला आदी.

# चातुर्मासाची सार्थकता परिवर्तनात आहे

**श्रृतमुनीजी महाराज यांचे प्रतिपादन; आनंदधाम येथे श्रमण संघीय उपप्रवर्तक श्री श्रृतमूनिजी म. सा. यांचा आध्यात्मिक चातुर्मास प्रवेश उत्साहात**

नगर - श्रमण संघीय उपप्रवर्तक दक्षिण दिवाकर कोटा संघ प्रमुख श्री श्रृतमूनिजी म.सा. आदि ठाणा ४ यांचा सन २०२४ च्या अध्यात्मिक चातुर्मासानिमित्त रविवारी सकाळी आनंदधाम येथे मंगल प्रवेश उत्साहात झाला. रविवारी सकाळी सारसनगर जैन धर्मस्थानक येथून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत श्री सिद्धार्थमूनिजी, अक्षरमूनिजी, आलोकऋषिजी, अबीरमूनिजी, मधुरमूनिजी आदी संतवृंद तसेच सेवाभावी श्री सत्य प्रभाजी महाराज साहब आदि ठाणा उपप्रवर्तनी साध्वी रत्ना श्री सन्मतिजी महाराज आदि ठाणा आदि महासतीजी विराजमान होत्या.

कलश व आगम ग्रंथ घेतलेल्या महिला, पाठशाळेतील लहान मुल मुली, अनेक युवक युवती मंडळ तसेच श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, आनंदराम मुनोत, सतीश लोढा, संतोष गांधी, अशोक पारख, नितीन कटारिया, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, मनिषा मुनोत, गुरु गणेश सेवा समितीचे अध्यक्ष सुरेश ललवाणी, वैशराज राका, सुरेश कोठारी, ताराचंद दुग्गड, अशोक बोरा, धरमचंद कोठारी, विजय मुनोत, रतीलाल कटारिया, अभय लुणिया, आनंद चोपडा, प्रितम गांधी, अमोल कटारिया, बाबुशेठ बोरा, अनिल दुग्गड, नितीन शिंगवी, राजेंद्र बोरा, अनिल मेहेर, प्रकाश छल्लाणी तसेच बाहेरगावाहून चेन्नई शिरुर नासिक पुणे औरंगाबाद संगमनेर पाथर्डी कडा येथून आलेले तसेच उपनगरातील व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला मंडळ, युवक युवती मंडळ व भाविक उपस्थित होते.

या प्रसंगी श्री श्रृतमूनिजी म. सा. यांनी सांगितले, चातुर्मास धर्म संदेश घेऊन आला आहे. धर्म बहर घेऊन आला आहे. गुरु आनंद, गुरु गणेश, गुरु मिश्री यांच्या पावन आशीर्वादामुळे आनंदधाम येथे कायम आनंदीआनंद असतो. आपण सर्वांनी एक साथ धर्म साधनेत सदैव कार्यरत राहून धर्म साधना तप जप ज्ञान ध्यान करायचे आहे. चातुर्मासाची सार्थकता परिवर्तनात आहे. भगवान महावीर स्वामीजींचा, आचार्य भगवंतांचा, गुरु गुरणींजीचा व सर्व चारित्र्यवान आत्मांचा पवित्र संदेश आपणा सर्वां पर्यंत पोहचवणे, विस्तार करने हेच माझ्या संयमी जीवनाचे लक्ष्य राहिल, असे सांगून महाराज साहेबांनी चातुर्मास होण्याकरीता विशेष प्रयत्न करणारे सर्वांचे नाव घेऊन धन्यवाद व्यक्त केले.

तप जप साधना, ज्ञान ध्यान आराधना व मानव जीवन सार्थक करण्यासाठी जैन धर्म परंपरेत प्रत्येक वर्षी चातुर्मास अनुष्ठान संपन्न होत असतात. धर्मप्रेमी श्रद्धाशील श्रावक श्राविकांना चातुर्मासिक आराधना करण्यासाठी या संतांचे बहुमूल्य मार्गदर्शन व विविध धार्मिक कार्यक्रमाचा, प्रवचनाचा लाभ होणार आहे. चातुर्मासात त्यांचे अनमोल ज्ञान व मार्गदर्शन अहमदनगर वासीयांना मिळणार आहे, असे सांगून महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म. सा.यांनी श्रृतमूनिजी आदी संतांना व सावेडी येथे चातुर्मास निमित्त सिद्धार्थमूनिजी यांना चातुर्मासिक शुभेच्छा आशीर्वाद दिले.

या चातुर्मास प्रवेश निमित्ताने विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले श्री सिद्धार्थमूनिजी म. सा. म्हणाले की, श्रृत म्हणजे ज्ञान व असा ज्ञानसागर प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी यांच्या सानिध्यात आनंदधाम येथे अवतरला आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

चातुर्मास मंगल प्रवेश प्रसंगी संतवृंदांचे भव्य स्वागत करून श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत म्हणाले की, आपल्या सर्वांना जागृत करणारा कालावधी चातुर्मास असतो. धर्माचा प्रचार प्रसार करून साधू-साध्वी भाविक भक्तांना धर्म आचरण बाबत जागृत करुन मोलाचे मार्गदर्शन चातुर्मास कालावधीत करतात. संतांच्या सान्निध्यात या धर्म आराधना करा व आपले जीवन कृतार्थ करा. धर्मप्रेमी श्रद्धाशील श्रावक श्राविकांना महिलांना युवक युवतींना चातुर्मासिक आराधना करण्यासाठी संतांचे बहुमूल्य मार्गदर्शन व विविध धार्मिक कार्यक्रमाचा, प्रवचनाचा लाभ श्रद्धाशील गुरूभक्तांना होणार आहे.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म. सा., कर्नाटक गज केशरी घोर तपस्वी श्री गणेशलालजी म. सा. व विदुषी गुरुवर्या श्री प्रभाकवरजी म. सा यांच्या कृपा आशीर्वादाने पंडित रत्न श्री मिश्रीलालजी म. सा.यांच्या मुखारविंदाने दीक्षा व्रत अंगीकार केल्यानंतर श्रृतमूनिजी म. सा. यांनी जैन धर्माचा सखोल अभ्यास करून संपूर्ण भारतभर जैन धर्माचा प्रचार प्रसार करून अनेक भाविक भक्तांना धर्म आचरण बाबत जागृत केले आहे. चातुर्मास प्रारंभ २० जुलै पासुन होईल. दैनिक कार्यक्रमात रोज सकाळी प्रार्थना ६ ते ७, प्रवचन सकाळी ९ ते १०, दुपारी २ वाजता मंगलपाठ व त्यानंतर धर्म चर्चा व संध्याकाळी सूर्यास्ता नंतर प्रतिक्रमण होईल.

पुज्यवरांचे स्वागत प्रसंगी उपस्थित सर्वांकरीता गौतमप्रसादीची व्यवस्था सौ. इंदूमती अशोक पारख परिवार यांच्या वतीने करण्यात आली होती. त्यांचे आभार व्यक्त करून श्रावक संघाचे सेक्रेटरी नितीन कटारिया म्हणाले, चातुर्मास कालावधीत अनेक धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तां करीता निवास, भोजन व्यवस्था करण्यात येते. या करीता ऐच्छिक दान किंवा एक दिवसीय भोजनमितीसाठी सहकार्य करावे असे सांगून आजच्या प्रवेश कार्यक्रम निमित्ताने उपस्थित सर्वांचे आभार धन्यवाद व्यक्त केले. जैन बांधवांना महिलांना युवा युवतींना धर्म साधना आराधना करण्यासाठी सरलमना उपप्रवर्तक श्रीजीं च्या अमृतमय वाणीचा लाभ होणार आहे या सुवर्ण क्षणाचा आपण सर्वांनी अवश्य लाभ घ्यावा.

## ब्राम्हण सभेतर्फे ओंकार संगीत निकेतनची भिंगारमध्ये १७ जुलैला 'तीर्थ विठ्ठल' मैफल

भिंगार - भिंगार ब्राह्मण सभा आयोजित आणि ओंकार संगीत निकेतन प्रस्तुत 'तीर्थ विठ्ठल' हा आषाढी एकादशीनिमित्त अभंगवाणी आणि भक्ती गीतांचा कार्यक्रम येथे १७ जुलै रोजी भिंगार येथील ज्ञानेश्वर मंदिरात ४ वाजता होणार आहे.

ओंकार संगीत निकेतनचे ४० विद्यार्थी हा कार्यक्रम सादर करणार आहेत. या कार्यक्रमाला संवादिनी साथ संगीता देऊळगावकर करणार असून तबला साथ अनुज दरवडे करणार आहेत.

तरी या कार्यक्रमाचा रसिकांनी आनंद घ्यावा, असे अवाहन भिंगार ब्राह्मण सभा अध्यक्ष आणि कार्यकारिणीने केले आहे.

## अमित गोरखे यांची विधानपरिषदेत आमदारपदी निवड झाल्याबद्दल नगरच्या रामवाडी येथे जल्लोष

नगर - मातंग समाजाचे अमित गोरखे यांना विधान परीषदेवर आमदार पदी निवड केली आहे. हि समाजासाठी खुप आनंदाची व अभिमानाची बाब आहे. संपुर्ण महाराष्ट्र राज्यात समाजाच्या वतीने जल्लोष करुन आनंदोत्सव साजरा होत असुन मातंग समाज विविध राजकीय पक्षांमध्ये पदाधिकारी, कार्यकर्ते म्हणुन कार्यरत आहे. अहिल्यानगर येथील रामवाडी भागात समाजाच्या वतीने गुलाल उधळुन व एकमेकांना पेढे भरवुन जल्लोष करण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार विजेते सुनिल सकट, मिराताई सरोदे, अशोक भोसले, प्रकाश वाघमारे, दिपक साबळे, विशाल नेटके, दिपक सरोदे, दिलीप जाधव, जय नेटके, पप्पु गायकवाड, सोमनाथ वैरागर, पोपट भोसले व समाज बंधु, भगिनी उपस्थीत होते.



मातंग समाजाचे अमित गोरखे यांची विधानपरिषदेत आमदार म्हणून निवड झाल्याबद्दल मातंग समाजाच्या वतीने रामवाडी येथे जल्लोष करण्यात आला.




गुणता आश्वासन नियंत्रणालय, अहमदनगरतर्फे आयोजित नि:शुल्क चिकित्सा तपासणी शिबिरात रुग्णांची तपासणी करताना डॉक्टर. दुसऱ्या छायाचित्रात शिबिर प्रसंगी नियंत्रक, ब्रिगेडीयर राजीव चावला, लेफ्टनंट कर्नल डॉ. सोमेश्वर गायकवाड, डॉ. सुमित बन्सल, डॉ. अर्चना नागरे, डॉ. जगदीश भराडीया, डॉ. ऋषीकेश पाटील इतर पदाधिकारी.

## 'गुणता आश्वासन नियंत्रणालया'च्या नि:शुल्क चिकित्सा शिबीरास प्रतिसाद

**१७० रुग्णांची तपासणी व उपचार**

नगर - गुणता आश्वासन नियंत्रणालय अहमदनगरतर्फे येथील सह्याद्री हॉल परिसरात नि:शुल्क चिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या स्वास्थ्य शिबीरात अनेक लोकांनी इलाज सहित मार्गदर्शन घेऊन शिबीराचा लाभ घेतला.

नियंत्रक ब्रिगेडियर राजीव चावला यांच्या अध्यक्षतेखाली मिल्ट्री हॉस्पिटलच्या (ई.सी.एच.एस.) डॉक्टर्स तसेच अन्य स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या टीमने (सी.क्यु.ए.व्ही.) अधिकारी कर्मचाऱ्यांची नि:शुल्क तपासणी केली.

शिबीरात सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल सोमेश्वर गायकवाड यांनी जीवनशैली तसेच विकारावर नियंत्रण ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. सुमित बन्सल यांनी दंत संबंधी, लेफ्टनंट कर्नल नागरे (कान, नाक, घसा तज्ज्ञ), मेजर डॉ. प्रिया मोल, डॉ. अर्चना नागरे, डॉ. जगदीश भराडीया, ऋषीकेश पाटील (नेत्ररोग विशेषज्ञ) यांनी या स्वास्थ्य शिबीरात महत्त्वाचे योगदान दिले.

या शिबीराचा लाभ १७० रुग्णांनी घेतला. शिबीरात संयोजन समितीचे अधिकारी लेफ्टनंट कर्नल अशुतोष सूद, समितीचे उपसभापती बी. तेली यांच्या सह इतर अधिकारी उपस्थित होते.

## डिजीटल शिक्षणपध्दती आत्मसात करण्याची गरज

**अभिषेक कळमकर यांचे प्रतिपादन; लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयात माता-पालक शिक्षक संघाची निवड**

नगर - प्रत्येक विद्यार्थ्यांची सर्वांगीन प्रगती, ही शिक्षकांची नैतिक जबाबदारी आहे. रयत शिक्षण संस्थेत सर्वसामान्यांची मुले घडत असताना, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शैक्षणिक संकुलातील शिक्षक कधीही कमी पडलेले नाही. विद्यार्थ्यांच्या यशातून शाळेची गुणवत्ता स्पष्ट होत आहे. शिक्षणाच्या डिजीटल युगात पुढे जाण्यासाठी डिजीटल शिक्षणपध्दती आत्मसात करण्याचे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी केले.



लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाच्या माता-पालक शिक्षक संघाच्या निवडप्रसंगी 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अभिषेक कळमकर. समवेत ज्ञानदेव पांडुळे, अंबादास गारुडकर, मुख्याध्यापक, शिक्षक, माता पालक.

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाच्या पालक शिक्षक सहविचार सभेत मार्गदर्शन करताना श्री.कळमकर बोलत होते. शाळेत झालेल्या सभेप्रसंगी जनरल बॉडी सदस्य अर्जुन पोकळे, ज्ञानदेव पांडुळे, शाळा सल्लागार समिती सदस्य अंबादास गारुडकर, शामराव व्यवहारे, उद्योजक जयद्रथ खकाळ, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी लंके, लक्ष्मण ठाणगे, फारुक रंगरेज आदी उपस्थित होते.

प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत व रयत गीत सादर करण्यात आले. लक्ष्मीबाई व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करुन सभेला सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका छायाताई काकडे यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शाळेत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी पालक-शिक्षकांमधील संवाद महत्त्वाचा असून, यासाठी पालक शिक्षक संघ महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या सभेत माता-पालक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध शैक्षणिक स्पर्धा परीक्षा व कला-क्रीडा क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. ज्ञानदेव पांडुळे यांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी आवश्यक असलेली पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांची त्रिसूत्री सांगितली.

अर्जुनराव पोकळे म्हणाले की, केवळ उत्कृष्ट टक्केवारी म्हणजे गुणवत्ता नव्हे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे, त्यासाठी आवश्यक आहे. एखाद्या विशेष गुणांमुळे कमी टक्के प्राप्त असलेला विद्यार्थी देखील भविष्यात यश प्राप्त करू शकतो. यासाठी विद्यार्थ्यांमधील क्षमता व गुण ओळखण्याची गरज असल्याचे सांगितले.

भरमसाठ पैसे कमावणारा डॉक्टर घडण्यापेक्षा, सामाजिक बांधिलकी जपणारा डॉक्टर घडणे म्हणजे उत्तम शिक्षण होय. समाजात उत्कृष्ट डॉक्टर बरोबर उत्कृष्ट शिक्षक घडविणे काळाची गरज बनली असल्याचेही त्यांनी सांगितले. तर बदललेल्या शैक्षणिक धोरणाविषयी माहिती दिली. उपस्थित पालकांनी देखील विविश सूचना मांडल्या. प्रभाकर थोरात, स्मिता पिसाळ व राजेंद्र देवकर या शिक्षकांनी पालकांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप पालवे यांनी केले. आभार महादेव भद्रे यांनी मानले.



छत्रपती अभियांत्रिकीमध्ये शिक्षक-पालक मेळाव्यामध्ये पालकांसमवेत प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे, डॉ. एम. के. भोसले, प्रा. एस. एम. वाळके, प्रा. पी. जी. निकम, प्रा. व्ही. व्ही. जगताप, प्रा. एस. आर. पवार, प्रा. ए. बी. काळे आदि

## छत्रपती अभियांत्रिकीमध्ये शिक्षक-पालक मेळावा

निंबळक - नेप्ती (ता.नगर) येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील शिक्षक - पालक मेळावा १३ जुलै रोजी झाला. या मेळाव्याचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाय.आर.खर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. एन. बी. गाडे यांनी केले. कॉम्प्युटर, सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स इन टेलिकम्युनिकेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग या सर्व विभागातील विद्यार्थ्यांच्या पालकांनी विभाग प्रमुख आणि वर्गशिक्षक यांच्याशी संवाद साधला तसेच पालकांच्या शंकांचे व समस्यांचे निरसन करण्यासाठी विविध उपाय योजना ह्या महाविद्यालयीन स्तरावर राबविण्यात येतील असे आश्वासन दिले. प्रत्येक विभाग प्रमुख यांनी महाविद्यालयात आणि विभागात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, नवीन अभ्यासक्रम आणि महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा या सर्व माहितीचे सादरीकरण पालकांसमोर केले.

महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असून पालकांनी आणि शिक्षकांनी मिळून विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना खतपाणी घालून अभ्यासक्रमात त्यांना प्राविण्य मिळवून देण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी केले. याप्रसंगी डॉ. एम. के. भोसले, प्रा. एस. एम. वाळके, प्रा. पी. जी. निकम, प्रा. व्ही. व्ही. जगताप, प्रा. एस. आर. पवार, प्रा. ए. बी. काळे आदि उपस्थित होते.

## श्री स्वामी समर्थ देवस्थान माळकुप येथे २१ जुलै रोजी भरगच्च कार्यक्रम



नगर - श्री स्वामी समर्थ देवस्थान माळकुप (पारनेर, नगर) येथे प्रतिवार्षिक श्री गुरु पौर्णिमा महोत्सव यंदाही अत्यंत भव्य दिव्य आणि नेत्रदीपक असा होणार आहे. संपूर्ण दिवसभर धार्मिक व मन प्रसन्न करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. २१ जुलै रोजी पहाटे पासून रात्री पर्यंत भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. श्री स्वामी समर्थ महाराज मुर्ती व श्री पादुका अभिषेक, वस्त्रालंकार पूजा, स्वामी सेवक किरण पंडित यांनी केलेल्या सामुहिक नामजप सेवेच्या पूर्णाहुती निमित्त महायज्ञ होणार आहे.

सकाळी १०.३० वा. महायज्ञ सुरु होईल. दुपारी पादुका पालखीत बसवून पालखी सोहळा होणार आहे. खास गुरु पौर्णिमेनिमित्त श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थानमध्ये आकर्षक फुलांची व विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. दिवसभर येणाऱ्या भाविकांना खिचडीच्या प्रसादाचे नियोजन गोरेगाव येथील स्वामी भक्त प्रमोद तांबे यांनी केले आहे. तसेच दिवसभर भजन सुरू आहे. सायंकाळी स्वामी भक्तांना सेवेचा खराखुरा आनंद देणारा एक सुंदर श्रवणीय स्वर साधना हा भक्ती संगीताचा कार्यक्रम होणार आहे.

तसेच नियमितपणे श्री स्वामींची महाआरती व अन्नदान सेवा भाळवणी येथील स्वामी भक्त योगेश कुंभकर्ण, रविंद्र रोहोकले, सुमित रोहोकले, प्रदीप बोरुडे यांच्या हस्ते स्वामींची महाआरती व त्या नंतर अन्नदान सेवा होणार आहे.

गुरुपौर्णिमेनिमित्त पुणे, मुंबई, अहमदनगर येथील स्वामी भक्त व नामधारक सेवेकरी बंधू भगिनी उपस्थित राहणार आहेत. आपणही गुरुपौर्णिमेच्या या आनंदात सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थान माळकुप करीत आहे.

## सत्नाम साक्षी गो-शाळेतर्फे आषाढी एकादशीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

सत्नाम साक्षी गौशाळा

नगर - बारस्कर मळा, सावेडी, नगर येथील सत्नाम साक्षी गो-शाळेत सालाबादप्रमाणे १७ जुलै रोजी आषाढी (देवशयनी) एकादशी निमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ५ ते ६ सुखमणि साहिबचा पाठ, ६ ते ७ हवन, ७ वा.गोमातेची पूजा, आरती व छप्पन भोग (व्यंजन) गायींना खाऊ घातले जातील. या शिवाय झुलेलाल देवजींच्या बहराणो साहिब ची पूजा, आरती, पल्लवचा कार्यक्रम होईल. त्यानंतर भाविकांसाठी उपवासाचे पदार्थ (लंगर) वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष जीवनाराम हिरानंदानी यांनी दिली. त्यांनी पुढे सांगितले की, सद्गुरु स्वामी शांती प्रकाश महाराज व विद्यमान सद्गुरु स्वामी भगत प्रकाशजी महाराज यांच्या शिकवणुकीनुसार आम्ही व सेवेकरी अहोरात्र गो-सेवा करीत असून, नुकताच गो-शाळेचा तिसरा वर्धापन दिन धार्मिक कार्यक्रमांनी साजरा झाला. तसेच प्रत्येक एकादशीला हवन, सत्संग, भजनांचा कार्यक्रम होऊन प्रसाद वाटप केले जाते, असे सांगितले.

भाविकांनी सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सत्नाम साक्षी गो-शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.



तपोवन रोडवरील एकता एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी संचलित डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक विद्यालय व गुरुकुल इंग्लिश मिडियममध्ये आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडीत वारकरी बनलेले विद्यार्थी. समवेत शिक्षक-शिक्षिका.

# ‘गुरुकुल कॅम्पस’मध्ये बालदिंडीच्या अश्वरिंगण सोहळ्याने पसरले चैतन्य

नगर - तपोवनरोड येथील एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित डॉ. पी. ए. इनामदार प्राथमिक विद्यालय व गुरुकुल इंग्लिश मिडीयममध्ये आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांच्या बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत सकाळीच ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदुंगाच्या गजरात भक्तीमय वातावरणात डोळे दिपून टाकणारा अश्वरिंगण सोहळा पार पडला. माऊलीच्या गजरात पालखीभोवती धावलेल्या अश्वाने डोळ्यांचे पारणे फेडले.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बालदिंडीप्रसंगी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा साकारली तसेच सर्व विद्यार्थ्यांनी वारकरी बनून दिंडीची शोभा वाढवली. या दिंडीचा शुभारंभ असिस्टंट जनरल मॅनेजर इलाक्षी होंडा श्रीराम आव्हाड यांनी केला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष एन. ए. पठाण, शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, सदस्य देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, समीर पठाण, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शुभम टेमकर, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या दीप्ती कराळे, पालक उमा मैड, सुजाता तागड, स्नेहल शिनगारे यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी पालकवर्ग तसेच परिसरातील नागरिक दिंडीमध्ये सहभागी झाले. अशोक भोसले, गोपाल परदेशी, छोटू परदेशी, राजेंद्र कोरी, गोल्डी कोरी, सुभाष कोरी आणि मित्र मंडळातर्फे विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

# सहकारात काम करताना समाजहिताचा विचार आवश्यक

## जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांचे प्रतिपादन; नगर सीए शाखेतर्फे आयोजित सहकार प्रशिक्षणाला मोठा प्रतिसाद





नगर सीए शाखेतर्फे आयोजित सहकार प्रशिक्षण शिबीरप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी. समवेत मिलिंद काळे, यशवंत कासार, सनित मुथा, प्रसाद पुराणिक, अभयकुमार कटारिया, महेश तिवारी, ज्ञानेश्वर काळे, पवनकुमार दरक आदी.

नगर - सहकारामध्ये मानवी स्तर, सामाजिक स्तर तसेच आर्थिक स्तर बदलण्याची ताकद आहे. समाजात मानवाची पत वाढविण्याचे काम सहकार करत आहे. भांडवलशाही आणि समाजवाद यातून मार्ग काढण्यासाठी वेगळा विचार करावा लागेल. त्यासाठी सहकार हाच एकमेव पर्याय आहे. नगर जिल्हा हा सहकाराची पंढरी असल्यामुळे नगर जिल्हा दिशादर्शक होऊ शकतो. सहकारात काम करताना समाज हिताचा विचार करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांनी केले.

सीए अहमदनगर शाखा व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आयोजित सीए सहकार प्रशिक्षण उपक्रमाचे उद्घाटन गणेश पुरी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावर्षी एकूण २५० पेक्षा जास्त सहकारी बँका व पतसंस्था यांचे प्रतिनिधी व सीए उपस्थित होते. गेल्या पाच वर्षापासून सहकारी बँका, पतसंस्था, चार्टर्ड अकाऊंटंट यांच्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे.

मान्यवर अतिथी कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे व उपाध्यक्ष सीए यशवंत कासार यांनी ‘सहकार क्षेत्रातील आव्हाने व त्यावरील उपाय’ याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्या अध्यक्षा सीए रेवती पैठणकर यांनी ‘रिस्क बेस इंटरनल ऑडिट’ या विषयावर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात सुनील नायगावकर यांनी सहकारी पतसंस्था व बँका संबधित अद्यावत महत्वाचे बदल, चौथ्या सत्रात अभयकुमार कटारिया यांनी कर्जदारची पत कशी ओळखावी या बद्दल सविस्तर माहिती दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात पुणे येथील सहकार क्षेत्रातील व्याख्याते गणेश निमकर यांनी सहकारी बँका व पतसंस्था यांनी व्यवसायात ग्राहक वृद्धी कशी करावी याचे मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात किरण पाटोळे यांनी सहकारी बँका व पतसंस्थामध्ये सायबर सेक्युरीटी याबद्दल माहिती दिली

तिसऱ्या सत्रात संजय गोखले यांनी कार्यक्षम वसूली कशी करावी? तसेच वसूली करताना काय काळजी घ्यावी? या विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या खुमासदार शैलीत त्यांनी सहकार क्षेत्रात ४० वर्षांपेक्षा जास्त अनुभव असल्यामुळे प्रत्यक्ष वसूली करताना काय अडचणी येऊ शकतात आणि त्यावर कसं मार्ग काढायचा यासंबंधी अतिशय चांगले मार्गदर्शन केले. त्यानंतर सीए रोहित बोरा यांनी सहकार क्षेत्रात काम करतांना घ्यावयाची दक्षता या विषयी तर सीए ज्ञानेश्वर काळे यांनी सहकार क्षेत्रातील घोटाळे कसे ओळखावे या विषयावर मार्गदर्शन केले.

या अधिवेशनासाठी शाखेचे माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए सुशील जैन, सीए ज्ञानेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

नगर सीए शाखेने आयोजित केलेल्या शिबिराला सहकारी आर्थिक संस्थाचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी, प्रमाणित लेखा परीक्षक आणि सीए उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगर सीए शाखेच्या विद्यमान कार्यकारिणीचे सदस्य सनित मुथा, सीए प्रसाद पुराणिक, सीए अभयकुमार कटारिया, सीए महेश तिवारी, सीए ज्ञानेश्वर काळे, सीए पवनकुमार दरक परिश्रम घेतले.

# शिक्षण पाया भक्कम झाल्यास मुलांच्या उज्वल भवितव्याच्या इमारती गगनाला भिडणार

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; पी.ए. इनामदार शाळेत हेड गर्ल व हेड बॉयची निवड

नगर - शिक्षण हा जीवनाचा पाया असून, हा पाया भक्कम झाल्यास मुलांच्या उज्वल भवितव्याच्या इमारती गगनाला भिडणार आहे. शिक्षणाबरोबर खेळाला प्रोत्साहन देण्याची गरज असून, खेळाने मुलांचा शारीरिक विकास होऊन त्यांच्यामध्ये खेळाडूवृत्ती वृध्दींगत होते. करिअर म्हणजे फक्त शिक्षण नसून, वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये संधी निर्माण झाल्या आहेत. मुलांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यास प्रोत्साहन देण्याचे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

मुकुंदनगर येथील पी.ए. इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षासाठी हेड गर्ल व हेड बॉयची निवड करण्यात आली. तर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आमदार जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष साहेबान जहागीरदार, महासचिव अब्दुल रऊफ खोकर, संस्थेचे चेअरमन अब्दुल रहीम खोकर, इंजि. इकबाल शेख, विकार काझी, शब्बीर अहमद, प्राचार्य फिरोज अली आदीसह पालक उपस्थित होते.



मुकुंदनगर येथील पी.ए. इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये हेड गर्ल व हेड बॉय यांच्यासह १० वी व १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी आ. संग्राम जगताप. समवेत साहेबान जहागिरदार, अब्दुल रऊफ खोकर, अब्दुल रहिम खोकर, इकबाल शेख, विकार काझी, शब्बीर अहमद, प्राचार्य फिरोज अली आदी.

साहेबान जहागीरदार म्हणाले की, पालकांनी आपल्या मुलांमधील कौशल्य ओळखले पाहिजे. प्रत्येक क्षेत्राचे व्यावसायिकीकरण झाले असून, आपले मुले घडविताना योग्य विचार करुन वाटचाल करावी. मुलांचे ध्येय अगोदरच स्पष्ट असल्यास ते ध्येय सहज गाठले जाऊ शकतात. ध्येय नसलेले विद्यार्थी दिशा भरकटणार असून, पालक व शिक्षकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांना ध्येयाकडे घेऊन जाण्याचे कार्य करावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अब्दुल रऊफ खोकर म्हणाले की, दरवर्षी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. यावर्षी देखील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नेहमीच राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्राचार्य फिरोज अली यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. अब्दुल रहीम खोकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. शाळेच्या हेड गर्ल पदी जेबा समीर शेख, असिस्टंट हेड गर्ल पदी माहिनूर आदिल शेख व हेड बॉय पदी यासीन अन्सार शेख, असिस्टंट हेड बॉय पदी जुनेद युनूस शेख या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या या विद्यार्थ्यांना आमदार संग्राम जगताप यांनी शपथ दिली. तर उपस्थितांच्या हस्ते दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमय्या शेख यांनी केले. आभार अब्दुल रऊफ खोकर यांनी मानले.

# गोदाम बांधकाम व बीजप्रक्रिया संच उभारणीसाठी २० जुलैपर्यंत अर्ज करा

नगर - अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान-कडधान्य व राष्ट्रीय खाद्यतेल गळीतधान्य अभियान २०२४-२५ योजनेंतर्गत जिल्ह्यात अुनदानावर गोदाम बांधकाम व बीज प्रक्रिया संच उभारणी घटकासाठी अनुदान देण्यात येणार आहे. शेतकरी उत्पादक संघ व शेतकरी उत्पादक कंपनी यांनी गोदाम बांधकाम व बीजप्रक्रिया संच उभारणीसाठी २० जुलैपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

जिल्ह्यासाठी २५० मे. टन गोदाम बांधकामासाठी अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान-कडधान्य ६ व राष्ट्रीय खाद्यतेल गळीतधान्य १ गोदाम बांधकामाचे भौतिक उद्दिष्ट प्राप्त आहे. प्रत्यक्ष बांधकामाच्या ५० टक्के किंवा १२ लक्ष ५० हजार जे कमी असेल अशी अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान- कडधान्य १ बीज प्रक्रिया संच उभारणी प्रकल्पाकरिता उभारणीच्या ५० टक्के किंवा १० लाख रुपये जे कमी असेल अशी अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. सदर बाब ही बँक कर्जाशी निगडीत असल्याने योजनेच्या लाभासाठी अर्जदारांनी प्रस्ताव सादर करताना केंद्र शासनाच्या ग्रामीण भांडार योजना, नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर संबंधित अर्जदार कंपनी, संघ या बाबींचा लाभ घेण्यास पात्र राहील. इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज करताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाईन्स, स्पेसीफिकेशन व खर्चाच्या अंदाजपत्रकासह अर्ज तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावा. शेतकरी उत्पादक संघ व शेतकरी उत्पादक कंपनी यांनी सभासद यादी, मागील वर्षाचे ऑडीट रिपोर्ट तसेच ७/१२,८ अ सादर करावेत.

# मंगल भक्त सेवा मंडळाकडून श्री शाहू विद्यालयात शालेय साहित्य वाटप




नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे खडांबे येथील श्री शाहू विद्यालयात शालेय साहित्याचे वाटप करताना मंगल भक्त सेवा मंडळाचे किर्तीकुमार कोठारी, बंडूनाना सप्रे, योगेश कंठाळे, विजय शिरसाठ आदी.

नगर - अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री शाहू विद्या मंदिर खडांबे (ता.राहुरी) येथे १३ जुलै रोजी इ ५ वी ते १० वी पर्यंतच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) अहमदनगरच्या वतीने शालेय साहित्य स्वरूपात वह्यांचे वाटप मंडळाचे सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, बंडूनाना सप्रे, योगेश कंठाळे, विजय शिरसाठ, संतोष व्यवहारे यांचे हस्ते मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांच्या वतीने सामाजिक दायित्व या भावनेतून करण्यात आले.

याप्रसंगी मंडळाचे सेवेकरी संतोष व्यवहारे यांनी आपल्या मंडळाच्या वतीने चालू असलेल्या उपक्रमाबाबत माहिती व त्याचा उद्देश स्पष्ट केला. या सामाजिक कार्याबद्दल ऋण व्यक्त करताना विद्यालयातील शिक्षक संदीप बांगर यांनी मंडळाच्या उपक्रमांबाबत कौतुक केले. या प्रसंगी समोरील सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व समाधान पाहुन श्री शंकरबाबा महाराज व गुरुवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांनी दिलेल्या मानवतेच्या शिकवणीची आठवण झाली. त्याचबरोबर संदीप बांगर यांनी या विद्यार्थ्यांप्रती भावी काळात आपल्या मंडळाचे असेच सहकार्य राहील अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक जयसिंग नरवडे, पर्यवेक्षक आप्पासाहेब शिंदे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष गुरुवर्य भाऊंचा सन्मान आप्पासाहेब (बंडूनाना) सप्रे यांनी स्विकारला. यावेळी वह्यांची मागणी, वाटप व नियोजन प्रसंगी मंडळाचे सदस्य संदीप बांगर यांचे सहकार्य लाभले.

तसेच आपल्या मंडळास या विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सेवा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल संतोष व्यवहारे यांनी विद्यालयाचे आभार मानले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री मनोज अमरचंद चंगेडीया व सौ संगिता मनोज चंगेडीया, राहणार २४२३, अंबर प्लाझा, डाळमंडई, अहमदनगर यांच्या स्वकष्टार्जित उत्पन्नातून सामाईक खरेदी मालकीहक्काची व वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमच्या आशीलांना कायमखुश खरेदी देण्याचे ठरविले असून विसारपोटी रक्कमही स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा विश्वास व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या आशीलांना दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये अथवा फसवणूक होवु नये म्हणून मुद्दामहुन सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करत या द्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकती बाबत कोणतीही तक्रार अगर हरकत, कोणताही चालू वाद, दावा असल्यास, मनाई हुकू स्थगिती, गहाण, बँक बोजा, जप्ती, चार्ज, लिन, दान, बक्षीस पत्र, भाडेकरार, साठेखत, मदार, पोटगी, इजमेंट अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध अथवा अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे आशिल मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन** - डि ।। अहमदनगर सब डी।। तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बु येथील सर्व्हे नं १५/२ मधील प्लॉट नं १ ते ४/१ याचे एकूण क्षेत्रफळ १४७२.४५ यावरील मधुबन इलाईट या अपार्टमेंट मधील स्टीलट फ्लोरवरील फ्लॅट / फॅमीली युनिट नं १०३ याचे क्षेत्र ११८.२० चौ.मी. (१२७२ चौ. फुट) मिळकत अपार्टमेंटमधील सर्व सामाईक हक्क अधिकारसह या संपूर्ण मिळकतीच्या चतुर्सीमा पुढील प्रमाणे

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस - फ्लॅट / फॅमीली युनिट नं १०४
दक्षिणेस - फ्लॅट / फॅमीली युनिट नं १०२
पश्चिमेस - मार्जीनल स्पेस
उत्तरेस - मार्जीनल स्पेस

येणेप्रमाणे चतु: सीमा पूर्वक मिळकत (यदा कदाचित सदर चतु:सीमा चुकीच्या आढळल्यास रेवेन्यू रेकॉर्ड प्रमाणे असलेल्या चतु:सीमा बरोबरच्या सम जण्यात याव्यात) त्यातील सर्व इलेक्ट्रिक फिटिंग पाणी कनेक्शन, फर्निचर, लाइट कनेक्शन, वहिवाट वागणुकीच्या सर्व हक्कांसह, तदंगभुत वस्तूंसह, अपार्टमेंटमधील सर्व सामाईक हक्क अधिकारसह काहीही एक राखून न ठेवता.

दि १५/०७/२०२४
अहमदनगर.

**ॲड. एस. एल. आसावा.**
चेंबर नंबर १०९, लॉयर्स चेंबर्स,
जुने जिल्हा न्यायालय आवार, अहमदनगर

## जाहीर नोटीस

दि. १५/०७/२०२४

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर व्यवहारापोटी आमचे आशिलांनी विद्यमान मालकांना विसार रक्कम दिलेली आहे. सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर प्लॉटबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन** :- जिल्हा अहमदनगर पोट तुकडी ता. नगर पैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मे. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील मौजे कॅम्पनगर येथील कॅन्टोन्मेंट भागातील खालील वर्णनाची प्लॉट मिळकत :-

| जी.एन.आर.स.नं. | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| २० | एच - १ | २३०-७५ चौ. मी. |

(आय. आय. लाईन्स बंगला नं. १८)
हा संपुर्ण प्लॉट.

**यांसी चतु:सीमा -**

पूर्वेस : प्लॉट नं. एच-२,
दक्षिणेस : प्लॉट नं. आय - १,
पश्चिमेस : अंतर्गत रस्ता,
उत्तरेस : अंतर्गत रस्ता.

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक-**
**१) श्री. कमलकिशोर राध्येशाम सारडा,**
**२) श्री. विश्वेष कमलकिशोर सारडा,**
अ.क्र. १ व २ रा. घर नं. ३२३०, काळूबागवान गल्ली, हातमपुरा, अहमदनगर.

**ॲड. शामसुंदर व्हि. भुतडा**
ऑफिस : शॉप नं. ९, पुजा अपार्टमेंट
सहकार सभागृह रोड, अहमदनगर.
मो.नं. ९४२३७९२९२२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १५/०७/२०२४**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन** : जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, तालुका नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील खालील वर्णनाची प्लॉट मिळकत

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ४७/४ब/४ | १ | १९४१.०० चौ. मी. |

यापैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे उत्तरेकडील बाजूचे १/२ हिश्याचे प्लॉटचे क्षेत्र ९७०.५० चौमी बांधकाम परवानगीसह ही आहे त्या स्थितीत मिळकत.

**यांसी चतु:सीमा -**

पूर्वेस : पिंपळगांव रस्ता
दक्षिणेस : प्लॉट नं. १ पैकी उर्वरित क्षेत्र
पश्चिमेस : सर्व्हे नंबर ४७ पैकी
उत्तरेस : सर्व्हे नंबर ४२ पैकी

**विद्यमान मालकांचे नाव-**
**१. श्री जनक किशनचंद आहुजा**
**२. जतीन जनक आहुजा**
१ व २ रा. १९०, विराज कॉलनी, अहमदनगर.
**३. श्री लोकेश ईश्वरदास मेहतानी**
**४. श्री विजय अनिल भुतकर**
३ व ४ रा. मु पो नागरदेवळे, अहमदनगर.

**ॲड.आर.टी.शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहमदनगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशीलांबरोबर ठरलेला असुन, खाली नमुद केलेल्या विद्यमान मालकांनी आमचे अशील यांची खात्री व भरवसा देऊन कायमखुश खरेदी देणेचे ठरविले असुन विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालु असल्यास अथवा दान, बक्षीसपत्र, अव्वलजप्ती, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, लीन, इजमेंट, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार वगैरे असल्यास संबंधितांनी आपल्या हरकती, तक्रारी वगैरे लेखी स्वरुपात, ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन सात (०७) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष आणुन दाखवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलांसह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन दयावी. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास, तसेच ज्याचे सदर मिळकतीबाबत काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी सदरचे हक्क, हितसंबंध जाणीव पुर्वक सोडुन दिले आहेत असे समजुन आमचे अशील वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. तारिख १५/०७/२०२४

परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन** :- डि ।। अहमदनगर सब डि ।। ता. नगर पैकी अहमदनगर **महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी,** सर्व्हे नं. ९१/१ +९०/१अ१ प्लॉट नं. अे२३+ अे२४ चे क्षेत्रफळ ४०८.०० चौ.मी (सदर मिळकतीचा संगणिकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे गट क्रमांक व उपविभाग ९१/१/९०/१अ१/प्लॉट नं. अे२३ व २४ चे क्षेत्रफळ ४०८.०० चौ.मी.) यासी चतु:सिमा येणे प्रमाणे : - पुर्वेस : प्लॉट नं. अे २८ व अे २७, दक्षिणेस : प्लॉट नं. अे २५, पश्चिमेस : ६.०० मी रुंदीचा रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. अे २२, यावर बांधण्यात आलेल्या अथर्व रेसीडेन्सी या अपार्टमेंट मधील सेकंड फ्लोअर मधील निवासी सदनिका (फ्लॅट) नं. ७ याचे बिल्टअप क्षेत्र ३७.९७५ चौ. मी. बालकनी क्षेत्र १०.०२५ चौ. मी. व अनकाऊंटेड कॉमन प्रोजेक्शन एरिया ७.७५ चौ. मी. असे एकुण विक्री क्षेत्र ५५.७५ चौ. मी. ही संपुर्ण फ्लॅट मिळकत. यासी चतु:सिमा येणेप्रमाणे पुर्वेस : ओपन टु स्काय, दक्षिणेस : ओपन टु स्काय, पश्चिमेस : फ्लॅट नं. ८ व जीना, उत्तरेस : जीना व ओपन टू स्काय

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत त्यामधील तदंगभूत वस्तुंसह जाणेयेणेचे हक्कासह काही एक राखुन न ठेवता मिळकत.

**उपरोक्त मिळकतीचे विद्यमान मालक**
**श्री. नरेश हिरालाल जुनागडे**
रा. फ्लॅट नं. ए १००१, श्री स्वामी कृपा फेज २,
ढोकाळी नाका, मनोरमा नगर रस्ता, ठाणे

**ॲड. रजनी यशवंत गायकवाड नोटरी पब्लिक (भारत सरकार)**
**ॲड. मनोज यशवंत गायकवाड नोटरी पब्लिक (भारत सरकार)**
जिल्हा भाजपा कार्यालया शेजारी, कलानगर, गुलमोहर रोड, सावेडी,
अहमदनगर - ४१४००३. मो. नं. ९८९०००९०८८, ९८९०५८२८२५

# अर्थजगत



**अनिश्चित आर्थिक स्थिती आणि महागाईचा दर ५ टक्क्यांच्या आसपास असल्याने तूर्तास व्याज दरकपातीची चर्चाही घाईची ठरेल, असे सुस्पष्ट प्रतिपादन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी अलीकडेच केले. एका दूरचित्र-वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत दास म्हणाले, 'जागतिक पातळीवर आणि भारतात आर्थिक स्थिती सध्या अनिश्चिततेची आहे. निदान आपल्याकडे तरी व्याज दरकपातीवर चर्चेची वेळ अजून आलेली नाही. किरकोळ महागाईचा दर अद्याप ५ टक्क्यांच्या जवळ आहे. जून महिन्यासाठीही तो ५ टक्क्यांच्या आसपास राहील, असा आमच्या सर्वेक्षणाचा अंदाज आहे. त्यामुळे व्याज दरकपातीचा मुद्दा घाईचा ठरेल, असे मला वाटते. भविष्यातील गोष्टींबाबत चुकीचा संकेत देऊन बाजारातील घटक, अन्य सहभागी आणि इतरांना चुकीच्या गाडीत बसण्यास मी प्रवृत्त करणार नाही.'**

## दिवस अर्थसंकल्पाचे, आकडे महागाईचे... बाजार दबावात!

**शेअर बाजारासाठी वर्षभरातील सर्वांत मोठा मानला जाणारा 'इव्हेंट' म्हणजेच अर्थसंकल्प आता समीप आला आहे. यादरम्यान बाजारामध्ये वेगाने चढउतार होतात, हे इतिहासावरुन दिसून येते. त्यानुसार गतसप्ताहात बाजारात मोठी घुसळण दिसून आली. तथापि, सेन्सेक्समध्ये साप्ताहिक आधारावर ५२२.७४ अंकांची तर निफ्टी ५० मध्ये १७८.३५ अंकांची वाढ दिसून आली. या दोन्ही निर्देशांकांनी अनुक्रमे ८०८९३.५१ आणि २४५९२.२० हे नवे उच्चांकही प्रस्थापित केले आहेत. बाजारातील परिपक्व गुंतवणूकदार नेहमी रिस्क आणि रिवॉर्ड रेशोचा विचार करूनच शेअर्स खरेदी करतात. यानुसार, अनेक क्षेत्रातील समभाग महागडे वाटताहेत. चलनवाढीचा दर वाढला आहे. त्यामुळे बाजारामध्ये नफावसुली आणि विक्रीचा दबाव दिसू शकतो.**

केंद्रीय अर्थसंकल्पाची तारीख जशी जशी जवळ येत जाईल, त्याचा परिणाम शेअर बाजारावर नक्कीच होईल. त्याचाच एक भाग म्हणून मागील आठवड्यामध्ये सेन्सेक्स व निफ्टी शाळकरी मुलांसारखे उठाबशांचा खेळ करीत होते. गेल्या आठवड्यात शुक्रवारी सेन्सेक्सने ९९६ अंकाची वाढ घेत ८०,८९३ अंकाच्या सर्वोच्च पातळी गाठली; पण दिवसाखेरीस तो ८०,५१९ वर स्थिरावला. या दिवशी निफ्टीदेखील २४,५९२ अंकांच्या सर्वोच्च पातळीला स्पर्श करून २४,५०२ अंकावर स्थिरावला. शुक्रवारी निफ्टीमध्ये १८६ अंकाची वाढ नोंदविली गेली. सेंसेक्सच्या ३० पैकी २५ शेअर्समध्ये तेजी होती. टीसीएस कंपनीच्या तिमाही निकालाचा परिणाम बाजारात जाणवला. त्यामुळे आयटी इंडेक्समध्ये जवळपास ४ टक्क्यांनी वाढ झाली. टीसीएसच्या समभागामध्ये सात टक्क्यांनी वाढ दिसून आली. आयटी कंपन्यांच्या निकालाचा बाजारातील तेजीला हातभार लागला. निफ्टीमध्ये २४,६०० ते २४,८०० ही पातळी छेदण्यास प्रतिरोध झाला होता. मागच्या आठवड्यातही ती पातळी तोडून निफ्टीपुढे गेला नाही. त्यामुळेच भविष्यामध्ये बाजारात खरेदी - विक्रीचा हा सी- सॉ सारखा खेळ गुंतवणूकदारांना दिसू शकतो. किंबहुना, यातील गतिमानता वाढण्याची शक्यता आहे.

मागील आठवड्यात समभागांच्या घट आणि वाढीचे प्रमाण (रेशो) यांचा अभ्यास करता खरेदीपेक्षा विक्री जास्त झाली आहे. विशेषतः बाजारात देशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर शेअर खरेदी करण्याचे धोरण अवलंबले आहे. कदाचित केंद्रीय अर्थसंकल्पाचा दवाव विदेशी गुंतवणूकदारावर मोठ्या प्रमाणावर होत आहे. नवीन सरकार बजेटमध्ये कोणत्या प्रकारची धोरणे अवलंब करणार? या संदर्भामध्ये त्यांच्या मनामध्ये काही गोंधळ निर्माण झाला असावा. त्यामुळे बाजारात एफआयआयकडून विक्रीचा भडीमार दिसत आहे. त्यांनी नफावसुलीचे धोरण अवलंबलेले दिसते. असे असले तरीही निवडक व चांगले शेअर्स खरेदी करण्याकडे त्यांचे अधिक लक्ष आहे. विदेशी मोठे गुंतवणूकदार व वित्तीय संस्थेचा विचार करता भविष्यामध्ये काही निवडक व चांगल्या रेल्वे कंपनीचे शेअर्स खरेदी करण्याचे त्यांचे धोरण दिसते. बजेटमध्ये कोणत्या आर्थिक घटनांचा समावेश असेल, याचे अनुमान बांधून त्याचा फायदा उठवण्यासाठी समभागांची खरेदी करण्यावर त्यांचा भर आहे. अर्थसंकल्पामध्ये कोणत्या बाबी कटाक्षाने टाळल्या जातील व अर्थसंकल्पातील नकारात्मक बाबींचा आर्थिक परिणाम होऊ नये, याची ते काळजी घेत आहेत. जसजसा अर्थसंकल्प जवळ येत जाईल तसतशी शेअर बाजारात काहीशी अस्थिरता निर्माण होऊ शकते. बाजारातील ब्रेथ रेशोवर याचा नक्कीच परिणाम होतो, हे सामान्य गुंतवणूकदारांनी लक्षात ठेवावे .

■ शेअर बाजार

गतसप्ताहामध्ये गुरुवारी देशांतर्गत गुंतवणूकदारांनी खरेदी करण्याचा सपाटा लावला, तर विदेशी गुंतवणूकदारांनी विक्रीचा जोर लावला. ते एक प्रकारचे ते शीतयुद्ध अनेकांना जाणवले. देशी गुंतवणूकदारांमध्ये शेअर्स खरेदी करण्याची क्षमता वाढल्याने बाजारामध्ये मोठी घसरण झाली नाही, ही जमेची बाजू आहे. नॅशनल स्टॉक एक्सचेंजने दिलेल्या माहितीनुसार, स्वदेशी गुंतवणूकदारांनी १,६४७ कोटी रुपयांचे समभाग खरेदी केले आहेत; तर विदेशी गुंतवणूकदारांनी १,१३७ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली आहे.

अनेक तज्ज्ञांच्या मते, देशी गुंतवणूकदारांमध्ये लिक्विडिटी आणि स्ट्राँगअर्निंग ग्रोथ रेटमुळे बाजारात तेजीचे नवे विक्रम निर्माण होत आहेत. असे असले तरी काही समभागांचे भाव कमालीचे वाढल्यामुळे त्यामध्ये जोखीमही वाढली आहे. बाजारातील परिपक्व गुंतवणूकदार नेहमी रिस्क आणि रिवॉर्ड रेशोचा विचार करूनच शेअर्स खरेदी करतात. यानुसार, अनेक क्षेत्रातील समभाग महागडे वाटतात. कारण पीई रेशो अधिक आहे. दीर्घकालीन विचार केल्यास अनेक गुंतवणूकदार असे शेअर्स खरेदी करतात. मात्र शेअर ट्रेडर अल्पकालीन कालावधीसाठी शेअर्स खरेदी करत असताना चोखंदळपणाने विचार करून निवडक शेअर खरेदी करतात. त्यामुळे सध्या महागड्या व जास्त जोखीम आणि कमी परतावा असणाऱ्या शेअर्सची विक्री मात्र जोमाने केली जात आहे.

| | |
|---|---|
| ■ सेन्सेक्स | ८०,५१९.३४ (+६२२.००) |
| ■ निफ्टी | २४,५०२.१५ (+१८६.२०) |
| ■ बँक निफ्टी | ५२,२७८.९० (+८.२५) |
| ■ फिन निफ्टी | २३,६०४.४० (+४.९५) |

गतसप्ताहातील शेवटच्या सत्राचे बंदपातळी भाव

त्यातून बाजारात विक्रीचा दबाव वाढत आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये किरकोळ महागाईचा दर हा ५.०८ टक्क्यांवर गेला आहे. मागील चार महिन्यांचा विचार करता तो सर्वोच्च पातळीवरती गेला आहे. एप्रिलमध्ये महागाईचा दर ४.८५ टक्के होता. त्यानंतर अन्नधान्य, खाण्याच्या वस्तू इत्यादी घटकांमध्ये महागाई वाढत चालली आहे ही चिंतेची बाब आहे.

अशीच घटना खाद्यतेलाच्या संदर्भामध्ये आढळून येते. यात महागाईचा दर हा ८.६९ टक्क्यांवरून ९.३६ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. महागाईचा दर जसा वाढत जातो तशी सामान्य नागरिकांची खरेदीशक्ती कमी होत जाते. सामान्यांचे अंदाजपत्रक कोलमडले जाऊ शकते. स्थिर स्वरूपात मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये खर्च वाढत जातो. परिणामी अशा सामान्य व्यक्तीची बचत करण्याची क्षमता घसरत जाते. पर्यायाने बचतीचा प्रवास गुंतवणुकीकडे जास्त प्रवाही न होता तो मंदावतो. त्यात विरोध निर्माण होतो. यामुळे बाजारात घसरण वाढते, ही बाब लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

नॅशनल स्टॉक एक्सचेंजने सर्क्युलरद्वारे इंट्राडे ट्रेडिंगच्या मार्जिन फंडिंगमध्ये कोलॅटरल सिक्युरिटी संदर्भात नियम खूप सक्तीचा केला आहे. त्यानुसार १७३० सिक्युरिटीजपैकी १०१० सिक्युरिटीजना बाहेर काढले आहे. याचा बाजारावर परिणाम दिसून येणार आहे. एक ऑगस्टनंतर हा नियम लागू होईल. त्यानुसार मागील सहा महिन्यांच्या कालावधीत ट्रेडिंग ९९ टक्के झाली असेल तर इम्पॅक्ट कॉस्टनुसार ऑर्डर व्हॅल्यू कमी असेल. या सर्क्युलरच्या परिणाम हा शेअर ट्रेडिंगच्या लिक्विडिटी वर होऊ शकतो. त्याचप्रमाणे ज्या ट्रेडर, इन्वेस्टरनी शेअर्स ब्रोकरकडे सिक्युरिटी गहाण ठेवून मार्जिन घेतले आहे, अशा संबंधित ब्रोकरसाठी कोलॅट्रल सिक्युरिटी संदर्भात क्लिअरिंग हाऊसमध्ये रिस्क कमी होऊ शकते. अशा ब्रोकरना क्लिअरिंग कार्पोरेशन अकाउंट मेंटेन करणे गरजेचे आहे. अप्रत्यक्षरीत्या याचा सकारात्मक फायदा शेअर बाजारावर भविष्यात होऊ शकतो. येणाऱ्या आठवड्यामध्ये बजेट संदर्भात सकारात्मक आणि नकारात्मक बातम्यायेत जातील आणि त्याचा परिणाम बाजारावर होऊन, खरेदी- विक्रीचे धोरण अल्पकाळासाठी गतिमान होऊ शकते. असे झाले तरी पायाभूत सुविधा, रेल्वे कंपनीचे शेअर्स, फार्मा इंडस्ट्री, कृषी क्षेत्रातील निवडक शेअर्स आदी क्षेत्रातील शेअर्समध्ये कदाचित तेजी असू शकते. येणाऱ्या काळामध्ये बजेटमध्ये कोणत्या प्रकारच्या तरतुदी असतील? बजेट खर्चप्रधान संस्कृतीला प्राधान्य देणार आहे का की बचत संस्कृतीला जास्त उत्तेजन देणार आहे ही महत्त्वाची बाब राहील. सध्याचा विचार करता सामान्य गुंतवणूकदारांची क्रयशक्ती कमी कमी होत चाललेली आहे. ती सुधारण्यासाठी करविषयक सकारात्मक धोरण असावे . त्याचा परिणाम बचत वाढून गुंतवणूकीत वाढ होईल आणि बाजारासाठीही ती सकारात्मक बाब राहील. सध्या मान्सूनच्या समाधानकारक वाटचालीमुळे बाजारामध्ये स्थिरता दिसते. पण अर्थसंकल्प आणि महागाईच्या पार्श्वभूमीवर या आठवड्यात बाजारात नफावसुलीच्या धोरणाचा प्रभाव वाढलेला दिसू शकतो.

◆◆◆

## पहिल्यांदा 'रिटर्न' भरताना...

**इन्कम टॅक्स रिटर्न भरण्याची शेवटची तारीख ३१ जुलै आहे आणि जवळ येत आहे. तुम्ही पहिल्यांदाच रिटर्न भरणार असाल तर काही मूलभूत गोष्टी लक्षात ठेवा. सर्वप्रथम ३१ जुलैपर्यंत रिटर्न भरल्यास तुम्हाला दंडाला सामोरे जावे लागणार नाही. हे आयकर विवरण पत्र भरताना खालील बाबी लक्षात घ्या.**

■ एकूण करपात्र उत्पन्न : आयकर कायद्यांतर्गत पगारासह सर्व स्रोतांमधून तुम्ही कमावलेल्या एकूण उत्पन्नातून स्टँडर्ड डिडक्शन आणि भविष्य निर्वाह निधी सारख्या योजनांमधील गुंतवणुकीद्वारे होणारी वजावट कमी केले जाते.त्यानंतर उरलेले उत्पन्न हे करपात्र उत्पन्न असते.

■ आयकर प्रणाली : भारतात सध्या दोन आयकर प्रणाली कार्यरत आहेत: जुनी आणि नवीन. २०२० मध्ये नवीन प्रणाली आणली गेली, ज्यामध्ये आयकर दर भिन्न आहेत आणि सवलतीचे दर देखील भिन्न आहेत. परंतु यामध्ये काही विशिष्ट प्रकारच्या वजावटी आणि सवलती उपलब्ध नाहीत. रिटर्न भरताना तुम्हाला कोणती प्रणाली निवडायची आहे हे तुम्ही सूचित केले नाही, तर तुम्हाला थेट नवीन प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात येते. म्हणून, प्रथम दोन्ही प्रणालींचे फायदे आणि तोटे समजून घ्या आणि नंतर त्यापैकी एक निवडा.

■ आवश्यक कागदपत्रे : तुम्ही रिटर्न भरण्यास सुरुवात करण्यापूर्वी सर्व आवश्यक आर्थिक कागदपत्रे तुमच्याकडे ठेवा. तुम्ही नोकरी करत असाल तर तुमच्या कार्यालयातून मिळालेला फॉर्म १६ सर्वात महत्त्वाचा आहे. याखेरीज तुमच्याकडे तुमचे बँक स्टेटमेंट असले पाहिजे. कर वाचवण्याच्या उद्देशाने जी काही गुंतवणूक केली आहे त्याचे पुरावेही




गरजेचे आहेत. तुम्ही भाडे भत्त्यावर सूट मिळण्याचा दावा करत असल्यास, भाडे पावती जपून ठेवा. जर तुम्ही गृहकर्ज घेतले असेल तर त्याच्या व्याजावरील वजावटीसाठी कर्ज विवरणपत्र आवश्यक आहे. याखेरीज पॅन कार्ड आणि आधार कार्ड आवश्यक आहे.

■ फॉर्म २६एएस तपासा : तुमच्या संपूर्ण उत्पन्नाचा संपूर्ण तपशील आणि त्यावर कापलेला टीडीएस हा या फॉर्ममध्ये दिलेला असतो. कर आणि रिटर्न अचूकपणे भरण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.

■ ॲन्युअल इन्फर्मेशन स्टेटमेंट : यामध्ये व्याज, लाभांश, शेअर डीलमधून मिळणारे उत्पन्न आणि परदेशातून मिळालेले पैसे यांचा संपूर्ण तपशील असतो. हे सर्व तुमच्या रिटर्नमध्ये आधीच भरलेले असते.

■ टॅक्स झोन

प्राप्तिकर विभाग दरवर्षी करदात्यांच्या विविध श्रेणींसाठी वेगवेगळे रिटर्न फॉर्म जारी करतो. यातील योग्य फॉर्म हुशारीने निवडा.

■ योग्य कपातीचा दावा करणे : आयकर कायद्याच्या कलम ८०सी (रु. १.५ लाखांपर्यंतची वजावट), ८० डी (आरोग्य विमा), ८०टीटीए (देणगी) अंतर्गत मिळणाऱ्या वजावटी तुमचे करपात्र उत्पन्न कमी करतात आणि तुमचे कर दायित्व देखील कमी करतात. म्हणून, रिटर्न भरताना सर्व प्रकारच्या वजावटी आणि सवलतींचा दावा करा.

■ वेळेवर भरा : आयकर विवरणपत्र वेळेवर भरले नाही तर तुम्हाला दंड आणि व्याज भरावे लागू शकते. रिटर्न भरण्याची अंतिम तारीख साधारणपणे ३१ जुलै असते. तरीही, तारीख बदलली आहे किंवा वाढवली आहे का हे पाहण्यासाठी कृपया आयकर विभागाची वेबसाइट तपासावी.

■ ई-फायलिंग फायदेशीर आहे : आयकर विभाग स्वतःच्या पोर्टलद्वारे ई-फायलिंगला प्रोत्साहन देतो. ही प्रक्रिया अत्यंत सोयीस्कर आहे आणि यामध्ये चुकांना वावही कमी होतो. प्रथमच रिटर्न भरत असताना, तुम्ही पोर्टलवर तुमचे खाते उघडू शकता आणि नमूद केलेल्या प्रक्रियेचे पालन करून स्वतः रिटर्न सबमिट करू शकता.

■ पडताळणी विसरू नका : इन्कम टॅक्स रिटर्न भरल्यानंतर १२० दिवसांच्या आत त्याची पडताळणी करणे देखील आवश्यक आहे. तुम्ही आधारवर वन टाइम पासवर्ड मागवू शकता, नेट बँकिंग वापरू शकता किंवा आयटीआ-व्हीच्या प्रतीवर स्वाक्षरी करू शकता आणि सेंट्रलाइज्ड प्रोसेसिंग सेंटर, बेंगळुरू येथे पाठवू शकता.

## एसआयपीबाबत धरसोड टाळा

गुंतवणुकदारांनी आपल्या एसआयपीत एका फंडमधून दुसऱ्या फंडमध्ये सतत जाण्याचा किंवा बदल करण्याचा मोह टाळला पाहिजे. यास 'रिव्हर्सन टू मीन' संकल्पना कारणीभूत आहे. त्यामुळे दीर्घकाळापासून करण्यात येणाऱ्या गुंतवणुकीवरच्या चांगल्या परताव्यावर पाणी पडू शकते.

'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया'च्या आकडेवारीनुसार मे




२०२४ मध्ये सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन बंद होण्याचे प्रमाण ०.८८ टक्के या विक्रमी पातळीवर पोचले. हा आकडा सामान्य सरासरी ०.५१ टक्क्याच्या तुलनेत अधिक आहे. हे प्रमाण एखाद्या महिन्यात सुरू होणारे एसआयपी किती प्रमाणात बंद झाले, हे सांगते.

गेल्या काही महिन्यांमध्ये एसआयपी बंद करण्याचे प्रमाण अनेक कारणांनी वाढले होते. निवडणूक निकालावरून अनिश्चितता वाटू लागल्याने बाजारात चढ उतार राहिला. अनेक गुंतवणूकदारांनी नफेखोरी केली. कारण मिडकॅप आणि स्मॉलकॅपच्या शेअरचे मूल्य बरेच वाढले होते. केवायसी प्रक्रियेतील अडथळे हे देखील एसआयपी बंद होण्याचे महत्त्वाचे कारण मानले जात आहे. ज्या गुंतवणूकदारांनी आधारशिवाय केवायसी केलेली होती, त्यांना पुन्हा एकदा या प्रक्रियेतून जावे लागले. काही फंडांनी खराब कामगिरी केल्याने आणि आर्थिक ध्येयात बदल झाल्याने नव्याने फंड खरेदी करणे, उत्पन्नात घट किंवा खर्चात वाढ यासारख्या कारणांमुळेही एसआयपी बंद करण्याचा ट्रेंड राहिला.

### एसआयपी थांबविणे

एखादा फंड समाधानकारक परतावा देत नसेल तर ते एसआयपी बंद करण्याचे प्रमुख कारण राहू शकते. परंतु फंडच्या कामगिरीचे आकलन करताना आपली रणनिती ही तात्पुरत्या रुपात अनुकूल आहे की नाही किंवा फंडमध्येच काही उणिवा आहेत हे पाहिले पाहिजे. फंडमध्येच उणिवा असतील तर त्या दूर करायलया हव्यात. अन्य कारण म्हणजे फंडचे भवितव्य किंवा जोखीम उचलण्याच्या त्याच्या प्रोफाईलमध्ये होणारा बदल होय. कदाचित या बदलामुळे फंड हा गुंतवणूकदारांच्या पोर्टफोलिओत फिट बसत नसेल. याशिवाय गुंतवणूकदारांची जोखीम उचलण्याच्या क्षमतेत बदल झालेला असेल तरीही फंडच्या उपयुक्ततेवर परिणाम होऊ शकतो. जर उत्पन्नात घट किंवा खर्चात अचानक वाढ होत असेल तर गुंतवणूकदारांना व्यक्तिगत आर्थिक आव्हानांच्या कारणांमुळे त्यांच्यासाठी वेगळी रक्कम सतत बाजूला काढून ठेवणे कठीण राहू शकते. एसआयपीशी संबंधित आर्थिक ध्येय गाठले असेल तर त्याला थांबवता येणे शक्य आहे. सेवानिवृत्ती, जागेत बदल, आर्थिक मालमत्तेतून भौतिक मालमत्तेकडे जाणे अन्य कारण देखील राहू शकते.

### एसआयपी कधी थांबवू नये

दीर्घकाळातील गुंतवणूकदारांनी बाजाराच्या घसरणीत एसआयपी कधीही थांबवू नये. बाजारात घसरणीच्या काळात प्रत्येक प्रकारचा फंड हा जादा यूनिट खरेदी करतो. त्यामुळे दीर्घकाळात त्याचा चांगला परतावा मिळतो. वास्तविक घसरणीच्या काळात गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक वाढवायला हवी.

### फंड बदलण्याची जोखीम

गुंतवणूकदारांनी आपल्या एसआयपीला एका फंडातून दुसऱ्या फंडात सतत बदलण्याची सवय थांबविली पाहिजे. त्यास 'रिव्हर्सन टू मीन' अशी संकल्पना कारणीभूत आहे. बाजारातील विविध टप्प्यांत वेगवेगळ्या गुंतवणुक पद्धतीला प्राधान्य दिले जाते. उदा. २०१९ पासून २०२१ पर्यंत एखाद्या फंडने चांगली कामगिरी केली असेल तर त्याचे मूल्य चांगले राहते. प्रत्येक फंड मॅनेजरची आपली गुंतवणूकीची शैली असते. बाजाराच्या अनुकुल शैली नसेल तर त्याची कामगिरी खराबच राहिल. शेवटी काही जण खराब कामगिरीच्या फंडकडून दुसऱ्या चांगल्या फंडमध्ये जाण्याची धडपड करतात आणि फंडात आणि एसआयपीत बदलतात. हे धोरण एखादेवेळी फायदेशीर ठरू शकते. मात्र प्रत्येकवेळी अशीच सवय ठेवली तर नुकसान होऊ शकते.

या सवयीतून एखाद्या फंडच्या बाहेर पडलात तर तेथे कदाचित उसळी येण्याची शक्यता राहते. त्याचबरोबर दमदार कामगिरी करणाऱ्या फंडची निवड करत असाल तर तेथे कालांतराने घसरीचा माहोल राहू शकतो. यापासून वाचण्यासाठी फंडांत वैविध्यपणा असावा.

एकाच प्रकारचे फंड घेण्यापासून टाळले पाहिजे. प्रत्येक फंडसाठी अनुभवी फंड मॅनेजरची निवड करावी आणि दीर्घकाळांपर्यंत गुंतवणूक करावी. ◆◆◆

## म्युच्युअल फंडमध्ये पैसे गुंतवलेत?

तुम्हाला कोणत्याही गुंतवणुकीतून चांगला परतावा हवा असेल तर तुम्ही गुंतवणुकीच्या सुरक्षिततेचाही विचार केला पाहिजे. हीच गोष्ट म्युच्युअल फंडांनाही लागू होते. आजकाल विविध प्रकारच्या आर्थिक फसवणुकीच्या घटना घडत आहेत. अशा स्थितीत गुंतवणुकीबाबत अधिक सावध राहावे लागेल. म्युच्युअल फंड गुंतवणुकीच्या सुरक्षेसाठी, कॅम्सने काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. त्या म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक सुरक्षित ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतील.




■ तुमचा वैयक्तिक मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी तुमच्या पोर्टफोलिओमध्ये नोंदणीकृत असल्याची खात्री करा. तुमच्या पोर्टफोलिओमधील कोणत्याही व्यवहाराविषयीची माहिती किंवा सूचना नोंदणीकृत मोबाईल-ईमेल आयडीवर येत आहेत ना याची खातरजमा करा.

■ म्युच्युअल फंड/आरटीएकडून प्राप्त झालेल्या संप्रेषणांचे/सूचनांचे पुनरावलोकन करा. त्यध्ये कोणतेही अनधिकृत व्यवहार अथवा बदल झाले असल्यास तात्काळ त्याबाबत रिपोर्ट नोंदवा.

■ तुमचा ऑनलाईन ट्रॅन्झॅक्शन पासवर्ड, पिन आणि ओटीपी कोणालाही शेअर करू नका.

■ विश्वासू वितरक आणि अधिकृत कर्मचारी यांच्याशिवाय इतर कोणालाही स्वाक्षरी केलेली कागदपत्रे देऊ नका.

■ तुमची स्वाक्षरी केलेल्या रिक्त विनंत्या देऊ नका.

■ व्यवहार केल्यानंतर पावतीचा आग्रह धरा.

■ बँकेच्या आदेशात बदल केवळ तुमच्या विनंतीवर आधारभूत कागदपत्रांसह केले जातात.

■ तुमच्या बँकेच्या आदेशाचा पुरावा म्हणून तुम्ही देत असलेला चेक रद्द केल्याची खात्री करा.

■ तुमचा गुंतवणुकीचा चेक/डीडी फक्त म्युच्युअल फंडच्या किंवा त्या योजनेच्या नावेच द्या.

■ चेक जारी करताना, चेकच्या मागील बाजूस पोर्टफोलिओ क्रमांक/अर्ज क्रमांक आणि निधीचे नाव लिहिणे श्रेयस्कर ठरते.

■ गुंतवणुकीच्या वेळी नामांकन न विसरता द्या.

■ स्वयं-साक्षांकित कागदोपत्री पुरावा प्रदान करताना आवश्यक वाटल्यास, सबमिशनचे कारण स्पष्ट करा.

■ इलेक्ट्रॉनिक पेमेंट करण्यासाठी आरटीजीएस किंवा आयएफएससी कोडसह संपूर्ण माहिती द्या.

■ एखादी व्यक्ती तुम्हाला कमिशन, प्रोत्साहन, भेटवस्तू इ. देत आहे म्हणून एखाद्या योजनेत गुंतवणूक करणे टाळा.

■ महिन्यातून एकदा एकत्रित खाते स्टेटमेंटचा आग्रह धरा.

■ संबंधित म्युच्युअल फंडाकडून खात्यांचे तपशील प्राप्त झाल्यानंतर, डेटा कॅप्चरची शुद्धता तपासा, विसंगती (असल्यास) नोंदवा आणि ते त्वरित दुरुस्त करा.

■ तुमच्या रिडेम्प्शनचा मागोवा घ्या आणि तुमची रिडेम्प्शनची रक्कम तुमच्या खात्यात जमा झाल्याची खात्री करा.

■ तुमच्या फोलिओ/खात्याचा नियमितपणे मागोवा घ्या आणि माहिती अचूक असल्याची खात्री करा.

■ तुमच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी योग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधा.

## चांदीची चांदी कशामुळे?

जगाने कितीही आर्थिक मजल मारली आणि शेअर बाजारांनी कितीही नवी शिखरे गाठली तरी सोने आणि चांदी या दोन मौल्यवान धातूंची लोकप्रियता काही केल्या कमी होत नाही.

गेल्या काही महिन्यांत कमाल तापमानाप्रमाणे आणि सोने या बहुलोकप्रिय धातूच्या दरांप्रमाणेच चांदीच्या भावांनीदेखील सर्वप्रकारचे विक्रम मोडले आहेत. चांदी आता प्रति किलो ९२ हजारांच्या पल्याड पोहोचली आहे. किमतीच्या पातळीवर हा भारतातील सार्वकालिक उच्चांक मानला जात आहे. विशेष म्हणजे येत्या काही काळात चांदीची चमक अशीच राहणार असल्याचे मानले जात आहे.

वास्तविक चांदीने गेल्या चार दशकांत २६ पटींपेक्षा अधिक परतावा दिला आहे.

उद्योग विशेषत: इलेक्ट्रिक मोटारीतील बॅटरी, सौर ऊर्जेचे पॅनल आणि फाईव्ह जी तंत्रज्ञानात चांदीचा वापर वाढला आहे. त्यामुळे चांदीच्या मागणीत वार्षिक सात ते आठ टक्क्यापेक्षा अधिक वाढ झाली आहे.

■ इनव्हेस्टमेंट

मागणीत विक्रमी वाढ झाल्याने किमती देखील वाढल्या आहेत. दुसरीकडे मागणीच्या तुलनेत चांदीचे उत्खनन स्थिर पातळीवर आहे. किंबहुना यामध्ये काहीशी घसरणही झाली आहे.

२०१५ मध्ये चांदीचे जागतिक उत्खनन ८९.७ कोटी औस ( एक औस म्हणजे २८.३४ ग्रॅम) होते. २०२३ मध्ये यात घसरण होऊन ८२.४ कोटी औसवर आले आहे. सोन्याच्या किंमतीत वाढ होत असल्याने बहुतांश मंडळी




विशेषत: मध्यमवर्गातील नागरीक दागिन्यांसाठी चांदीकडे वळताना दिसत आहेत. त्यामुळेही चांदीच्या भावांनी उसळी घेतली आहे.

वास्तविक गेल्या दोन दशकांत उद्योग आणि तंत्रज्ञानात चांदीची उपयुक्तता वाढली आहे. 'इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी'च्या अहवालानुसार गेल्या वर्षात सौर ऊर्जेसाठी वापरले जाणाऱ्या 'फोटोव्होल्टेइक पॅनल्स'मधील गुंतवणूक एक वर्षाच्या तुलनेत दुपट होऊन ती ८० अब्ज डॉलरपर्यंत पोचली आहे. फोटोव्होल्टेइक पॅनल्समध्ये चांदीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. २०२४ मध्ये चांदीच्या मागणीत १.२ अब्ज औस वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चांदीच्या किमती वाढत असून लवकरच नवी उच्चांकी पातळी गाठण्याची शक्यता आहे.

यानंतर सर्व अंतराळ्यांनाना सिल्वर कोटिंग केली जावू लागली. या आधारे यानाचे तापमान कमी ठेवण्यात मदत मिळते. जगात लहान मोठ्या अशा एकूण ७५७ चांदीच्या खाणी आहेत. त्यापैकी भारतात केवळ सहा आहेत. जगभरामध्ये चांदीचा वाढत चाललेला वापर पाहता गुंतवणुकीसाठी हा एक उत्तम पर्याय ठरणार असल्याचे अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे. ◆◆◆

# 'जर-तर'चे समीकरण जुळले तरच नगर मतदारसंघात भाजपला संधी

## सर्व शक्यता गृहित धरून कार्यकर्त्यांकडून मतदारसंघावर दावा

नगर – विधानसभा निवडणूक तोंडावर आली असल्याने राजकीय दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच सामना रंगणार असल्याचे चित्र आजतरी आहे. त्यामुळे मतदारसंघावर दावे-प्रतिदावे केले जात असून नगर शहर विधानसभा मतदारसंघ भारतीय जनता पक्षाकडे द्यावा, अशी मागणी करत सोमवारी (दि. १५) पक्षाच्या बैठकीत ठराव मंजूर करण्यात आला.

भाजपने शहर विधानसभा मतदारसंघावर दावा करत तसा ठराव वसंत लोढा यांनी बैठकीत मांडला. तो सर्वसहमतीने मंजूर करण्यात आला. तथापी भाजप प्रणित महायुतीचा घटक पक्ष असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे हा मतदारसंघ आहे. या पक्षाचे विद्यमान आ. संग्राम जगताप हे या मतदारसंघाचे नेतृत्व करतात. महायुतीच्या जागावाटपात विद्यमान आमदारांचा मतदारसंघ त्या-त्या पक्षाला सोडला जाणार असल्याचे जवळपास निश्चित आहे. मात्र भाजपने या मतदारसंघावर दावा ठोकत ठराव केल्याने भविष्यात नगरमध्ये राजकीय 'कलगीतुरा' रंगणार यात शंकाच नाही.

मागील ३५ वर्षात शहर मतदारसंघ भाजपच्या वाट्याला आलेला नाही. २०१४ च्या विधानसभा स्वबळावर झाल्याने या मतदारसंघात भाजपला उमेदवार उभे करण्याची संधी मिळाली होती. हा अपवाद वगळला तर हा मतदारसंघ सातत्याने शिवसेनेकडे राहिला आहे. आताही महायुतीचा घटकपक्ष असणाऱ्या राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार या मतदारसंघात आहेत. त्यामुळे जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे जाईल हे निश्चित आहे. तथापी भाजप कार्यकतार्यांना भविष्यात काही वेगळेच घडेल अशी अपेक्षा आहे. विद्यमान आ. संग्राम जगताप ऐनवेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडे गेल्यास भाजपला येथून संधी मिळू शकते अशी आशा आहे.

मात्र तसे झाल्यास तो मतदारसंघ दशकोदशके शिवसेनेकडे राहिल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या मतदारसंघावर दावा करतील परंतु त्यातही शिवसेनेकडे एवढा तुल्यबळ उमेदवार आजतरी नाही. त्यामुळे हा मतदारसंघ भाजपला सोडला जाऊ शकतो असे भाकित वर्तवले जात आहे. आणि तिसरी शक्यता म्हणजे महायुतीऐवजी स्वबळावर निवडणुका झाल्यास भाजपला आपला उमेदवार उतरवता येईल. अशा सर्व शक्यता गृहीत धरून कार्यकर्त्यांकडून मतदारसंघावर दावा ठोकला जात आहे. परंतु यापैकी ऐकही राजकीय गणित प्रत्यक्षात जुळले नाही तर मात्र महायुती म्हणून कार्यकर्त्यांना जो उमेदवार असेल त्याला साथ द्यावी लागेल. आणि सध्या जे ठराव केले जातात ते केवळ पक्षीय पातळीवरील बैठकांच्या इतिवृत्तापुरतेच राहतील यात शंकाच नाही.

# विविध योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचवा

## प्रा. भानुदास बेरड यांचे आवाहन; शहर मतदारसंघ भाजपकडे घेण्याचा बैठकीत ठराव



अर्थसंकल्पातील ठळक बाबींचा समाजात उहापोह करण्यासाठी महानगरचे अध्यक्ष अभय आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मध्य मंडलातील बैठकप्रसंगी प्रा. भानुदास बेरड, वसंत लोढा, नरेंद्र कुलकर्णी, महेश नामदे, सचिन पारखी, प्रशांत मुथ्था. (छाया – उदय जोशी)

नगर – महिलाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची मदत होईल, कुटुंबाला हातभार लावता येईल, महिलांचे सक्षमीकरणासाठी पाठबळ मिळेल, अशा विविध योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचवा, असे आवाहन भाजपचे प्रा. भानुदास बेरड यांनी केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सुचनेनुसार अर्थसंकल्पातील ठळक बाबींचा समाजात उहापोह करण्यासाठी महानगरचे अध्यक्ष अभय आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली मध्य मंडलातील प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी प्रा. भानुदास बेरड यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी वसंत लोढा, नरेंद्र कुलकर्णी, महेश नामदे, सचिन पारखी, प्रशांत मुथ्था, पंडित वाघमारे, सौ. सविता कोटा, अजय चितळे, गोपाल वर्मा, बाळासाहेब भुजबळ, बाबा सानप, सुनील तावरे, गीता गिल्डा, कालिंदी केसकर, सुरेखा जंगम, राखी आहेर, राजू वाडेकर, अमोल निस्ताने, लक्ष्मीकांत तिवारी, बाळासाहेब खताडे, राजाभाऊ विद्ये, विलास नंदी, महेश गुगळे, महेश हेडा, करण डापसे, ज्ञानेश्वर धिरडे, संतोष गांधी, गणेश, राज शेलार, महावीर कांकरिया आदी उपस्थित होते.

नगर शहर मतदारसंघ हा भारतीय जनता पार्टीकडे घ्यावा, असा ठराव वसंत लोढा यांनी मांडला या ठरावाला सर्वानुमते माजी स्थायी समितीचे सभापती नरेंद्र कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले.

# नालेगावात घरातून चोरी; ४२ हजाराची रोकड लंपास

नगर – घरातून ४२ हजाराची रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. सदरची घटना ८ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा ते १३ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या दरम्यान नालेगावातील लांडे वस्तीवर घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विजय पाराजी लांडे (वय ६६) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी त्यांच्या घरात ८ जुलै रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ४२ हजाराची रोकड ठेवली होती. त्यानंतर चोरट्यांनी ती रोकड चोरून नेली. १३ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास रोकड चोरीला गेल्याचे विजय लांडे यांच्या लक्षात आले. त्यांनी १३ जुलै रोजी रात्री तोफखाना पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस अंमलदार योगेश चव्हाण करत आहेत.



## शालोम पारधे सीए परीक्षा उत्तीर्ण

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया (आयसीएआय) च्या वतीने मे २०२४ मध्ये घेण्यात आलेली सीए फायनल परीक्षामध्ये कोठी परिसरातील शालोम पारधे चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला आहे. या यशाबद्दल पारधे यांचा सत्कार करताना स्वप्निल शिंदे, आकाश कोरे, सुरज जोशी, रोजर घोडके आदी


# अल्पवयीन मुलाचे अपहरण; गुन्हा दाखल

नगर – क्लेरा ब्रुस येथील मुलांच्या वसतीगृहातून अल्पवयीन (वय १२) मुलाला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना घडली. वसतीगृहाच्या लता देविदास पंडीत (वय ४५, मुळ रा. नेवासा खुर्द, हल्ली रा. मुलांचे वसतीगृह, क्लेरा ब्रुस) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी क्लेरा ब्रुस येथील मुलांच्या वसतीगृहात नोकरी करतात. त्यांच्या वसतीगृहात अल्पवयीन मुलाला १२ जुलै रोजी सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडेपाच या वेळेत अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. फिर्यादी यांनी त्या मुलाचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. त्यांनी १३ जुलै रोजी रात्री कोतवाली पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केला असून अधिक तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे करत आहेत.

# राज्यातील लहान मुले आणि विद्यार्थ्यांना एनर्जी ड्रिंक्सचा विळखा

## आ. सत्यजीत तांबेनी सभागृहात मांडले वास्तव, अन्न व औषध प्रशासनाला धरले धारेवर, सभापती नीलम गोऱ्हेंनी १५ दिवसात बैठक घेण्याचे दिले आदेश



मुंबई – राज्यातील तरुणांचे प्रश्न सभागृहात कायम मांडणारे आमदार सत्यजीत तांबे यांनी आज सभागृहात लहान मुले आणि विद्यार्थ्यांच्या संदर्भातील महत्त्वाचा विषय हाती घेऊन संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधले. राज्यसरकारने ड्रग्ज मुक्त महाराष्ट्र मोहीम हाती घेतली असताना किरणा माल आणि शाळा कॉलेजच्या आसपास असलेल्या दुकानात कमी किंमतीत उपलब्ध होणारे एनर्जी ड्रिंक हे एखाद्या ड्रग्ज येवढेच घातक असल्याचे आमदार तांबे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. यावर सभापती नीलम गोऱ्हे यांनी चिंता व्यक्त करत येत्या १५ दिवसांत बैठक घेण्याचे आदेश संबंधित मंत्री आणि प्रशासनाला दिले.

जाहिरातींचे अनुकरण करून तरुण वर्गात दिवसेंदिवस एनर्जी ड्रिंकच्या नावाखाली कॅफेनयुक्त थंड पेय सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पेयामुळे आरोग्याला मोठा धोका निर्माण होत आहे. शाळा परिसरात एनर्जी ड्रिंकची सहज विक्री असल्याने शाळेतील मुलांना सहज उपलब्ध होत आहे. राज्यामध्ये शाळा परिसरातील कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी आणा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली. आमदार सत्यजीत तांबेंनी मांडलेल्या मुद्यावर मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी शाळा परिसरात ५०० मीटर अंतरावर कॅफेनयुक्त पेयांच्या विक्रीवर बंदी घालण्याचे जाहीर केले.

राज्यातील नाशिक मुंबईसह सर्वच शहरी आणि ग्रामीण भागात कॅफेनयुक्त पेय (एनर्जी ड्रिंक्स) तसेच नशेच्या गोळ्या बाजारात विक्रीसाठी सहज उपलब्ध आहेत. तरुण वर्गासोबतच लहान मुले देखील याकडे आकर्षित होत आहेत. शाळा व महाविद्यालय परिसरात कॅफेनयुक्त पेय (एनर्जी ड्रिंक्स) सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. त्याचबरोबर जाहिरातीच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणात कॅफेनयुक्त पेयांचा (एनर्जी ड्रिंक्स) प्रसार केला जातो. एनर्जी ड्रिंक्सच्या जाहिरातींवर देखील सरकारने बंदी घालावी तसेच शाळा परिसरात कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी घालून योग्य कार्यवाही करावी. याबाबत संबधित अधिकाऱ्यांसोबत एक बैठक घेण्यात यावी अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली.

आ. सत्यजीत तांबेंनी मांडलेल्या प्रश्नांवर अन्न व औषध प्रशासनाने या संदर्भात १५ दिवसाच्या आत बैठक घ्यावी. त्याचबरोबर एनर्जी ड्रिंक्सच्या जाहिरातींवर देखील काही आक्षेपार्ह असल्यास अधिकाऱ्यांना सांगून कायदेशीर कारवाई करावी, असे सभापती नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. शाळा परिसरात ५०० मीटर अंतरावर कॅफेनयुक्त पेयांवर (एनर्जी ड्रिंक्स) तातडीने बंदी घालण्यात येईल. त्याचबरोबर अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करून योग्य कार्यवाही करण्यात येईल. एनर्जी ड्रिंक्सच्या जाहिरातींवर देखील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी सांगितले.

### एनर्जी ड्रिंक्समुळे होणारे दुष्परिणाम कोणते?

एनर्जी ड्रिंक्समध्ये वापरण्यात येणारे कॅफेन शरीराला अत्यंत घातक

कॅफेनचे जास्त सेवन केल्यामुळे नशा येऊन मेंदू, किडनी, मज्जारज्जू यावर विपरीत परिणाम होतो.

अस्वस्थता, निद्रानाश, प्रजनन समस्या, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि चिडचिडेपणा या व्याधींचा धोका निर्माण होतो.

### वय वर्ष १८ खालील मुलांसाठी विक्री नाही

स्टिंग आणि आणि इतर काही एनर्जी ड्रिंक्सची किरण मालाच्या दुकानात मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. वस्तूत: हे एनर्जी ड्रिंक्स १८ वर्षाखालील मुलांनी सेवन करू नये असे लिहिण्यात आलेले असते मात्र विक्रेते याकडे साफ दुर्लक्ष करून सरसकट वयातील मुलांना याची विक्री करतात. अनेक पालकांमध्ये देखील याबाबत जागरूकता नसल्याने आढळून आल्याने विक्रीचे प्रमाण अधिक आहे.

# हर्ष शाह सी.ए. फायनल उत्तीर्ण



नगर – सारसनगर येथील रहिवाशी हर्ष शाह हे सीए फायनल परिक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. त्यांनी आर्टिकलशीप सीए रोहित बोरा यांच्याकडे केली आहे. शहरातील मे. भारत मशीनरी स्टोअर्सचे संचालक चंद्रकांत शाह यांचे नातू व मनिष शाह यांचे चिरंजीव आहेत.

# सीए फायनल परीक्षेत शशांक बंग उत्तीर्ण



नगर – इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंटस् ऑफ इंडिया च्या वतीने मे महिन्यात घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत शशांक बंग हा उत्तीर्ण झाला. अवघ्या २२ व्या वर्षी तो सनदी लेखापाल सारख्या अवघड परीक्षेत उत्तीर्ण झाला आहे.

शशांक बंग याची मोठी बहीण आणि दाजी देखील सीए आहेत. शशांकला सीए साईदर्शन बंग, सीए किरण भंडारी, सीए विजय मर्दा सर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. शशांक याचे वडील श्यामसुंदर बंग यांचे मार्केटयार्ड परिसरात दुकान असून आई गृहिणी आहे. त्याने त्याची आर्टीकलशिप पुण्यातील सीए फर्म बतिया ॲण्ड असोसिएट यांच्याकडे पूर्ण केली.

# आनंद गांधी व महावीर गांधी सी.ए. परीक्षा उत्तीर्ण



नगर – इंस्टीट्युट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियाच्या सी.ए. फायनल परीक्षेत आनंद व महावीर गांधी दोन्ही बंधु चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

सौ. अनिता व संतोष कन्हैयालाल गांधी (विमा प्रतिनिधी) यांचे ते चिरंजीव तसेच सावेडी संघाचे सेक्रेटरी संदीप गांधी व संजय गांधी यांचे पुतणे आहे. त्यांना सीए संदीप देसर्डा, सीए प्रसाद भंडारी, सीए अभय कटारीया, सीए मुकेश काणकीया, सीए किरण भंडारी सरांचे मौलिक मार्गदर्शन लाभले.


**कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहमदनगर**

**जाहीर ई-निविदा सुचना क्रमांक अहमदनगर - 04/2024-2025**

**अहमदनगर जिल्ह्यातील** मुख्यमंत्री ग्रामसडक योजना-II (Research and Development) अंतर्गत रस्ते दर्जोन्नती व ५ वर्षे देखभाल व दुरूस्तीच्या १ पॅकेजेसची ६ कामे एकूण अंदाजित किंमत रक्कम रू. १४७७.५२ लक्ष ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामांची सविस्तर ई-निविदा https://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. 15/07/2024 पासुन उपलब्ध होईल.

| ई-निविदा सुचना क्र. | एकुण कामे | एकत्रित अंदाजित किंमत |
|---|---|---|
| 04/2024-2025 | ६ कामे | रू. १४७७.५२ लक्ष |

सही/-
(प्र.गं.येळाई)
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहमदनगर


# दिव्यांग विद्यार्थी-पालक व विशेष शिक्षकांचे २२ जुलैला आयुक्त कार्यालयासमोर उपोषण

## विशेष शिक्षक ४८६० वाढीव पदे संचमान्यतेत मंजूर करून कार्यरत विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याची मागणी

नगर – दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून आणि त्यांना अध्यापन करणारे विशेष शिक्षक अधिकारापासून वंचित राहत असल्याने ४८६० एवढी विशेष शिक्षक वाढीव पदे संचमान्यतेत मंजूर करून कार्यरत १७७५ विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याच्या मागणीसाठी २२ जुलै रोजी शिक्षण आयुक्त कार्यालय (पुणे) समोर दिव्यांग विद्यार्थी-पालक यांच्यासह सर्व विशेष शिक्षक सहकुटुंब बेमुदत आमरण उपोषणाला बसणार असल्याची माहिती दिव्यांग कल्याण विशेष शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सरताज पठाण, उपाध्यक्ष उमेश शिंदे व सचिव राजीव चव्हाण यांनी दिली आहे.

दिव्यांग विद्यार्थी सर्व सामान्य मुलांसमवेत सामान्य शाळेत शिकू शकतील यासाठी समग्र शिक्षा समावेशित शिक्षण सन २००२ पासून उपक्रम सुरू करण्यात आला होता. दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना असणाऱ्या समस्या कमी करत संदर्भ साहित्य सेवेचा लाभ मिळवून देणे, विद्यार्थ्यांना अध्यापन सहाय्य करत स्वावलंबी बनविण्यासाठी आरसीआय धारक प्रशिक्षित विशेष शिक्षक बिंदुनामावली नुसार करार तत्त्वावर अल्प मानधनात नियुक्त करण्यात आले होते. आजही या विशेष शिक्षकांची संख्या बोटावर मोजण्याइतकी दिसून येत आहे. यामुळे आजही दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून आणि त्यांना अध्यापन करणारे विशेष शिक्षक अधिकारापासून वंचित राहिले आहेत. बालकाचे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार या विद्यार्थ्यांना खरचं अधिकार मिळाला का? हा प्रश्न समाजापुढे निर्माण झाला असल्याचे उमेश शिंदे यांनी स्पष्ट केले.

मागील १२ ते १८ वर्षांपासून राज्यामध्ये प्राथमिक स्तरावर १७७५ विशेष शिक्षक अल्प मानधनात करार पद्धतीने कार्यरत आहेत. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने १२ मार्च २०२४ च्या आदेशामध्ये स्पष्टपणे दिव्यांग विद्यार्थी संख्येनुसार विशेष शिक्षक पद निर्मिती करून, कार्यरत विशेष शिक्षकांना सामावून घेण्यात यावे असे नमूद केले आहे. दिव्यांग कल्याण विशेष शिक्षक संघटनेच्या निवेदनानुसार आझाद मैदान मुंबई येथे सलग ९ दिवस आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली १० ऑक्टोबर २०२३ रोजी बैठक होऊन दिव्यांग विद्यार्थ्यांना किती विशेष शिक्षकांची आवश्यकता आहे? यासाठी टीआयएसएस या संस्थेकडे कामगिरी सोपवून अहवाल मागविण्यात आला असता, ८ हजार ९०० विशेष शिक्षकांची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले. परंतु शासनाच्या संच मान्यतेत प्रत्येक बीआरसी/यूआरसी स्तरावर २ पदे याप्रमाणे फक्त ८१६ विशेष शिक्षक पद निर्माण करण्यात आले. एवढ्या अत्यल्प विशेष शिक्षक पद निर्मितीमुळे राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळने अवघड असल्याचे म्हंटले आहे.

न्यायालयाने ठरवून दिलेल्या १०:१ या विद्यार्थीशिक्षक गुणोत्तरानुसार किमान ७० ते ९० हजार दिव्यांग विद्यार्थ्यांना नोंदणीकृत प्रशिक्षित विशेष शिक्षकांकडून दर्जेदार नियमित व पूर्णवेळ शिक्षण मिळणे आवश्यक आहे. यासाठी प्रथमतः केंद्रस्तरावर किमान १ विशेष शिक्षक याप्रमाणे ४८६० केंद्र स्तराकरिता किमान ४८६० विशेष शिक्षक एवढी वाढीव पदे संचमान्यतेत मंजूर करून कार्यरत १७७५ विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. अहमदनगर जिल्ह्यातून दिव्यांग विद्यार्थी, पालक व सर्व विशेष शिक्षकांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन उमेश शिंदे, रवींद्र डालिमकर, माया हराल, रामेश्वर ढगे, विशाल टिपरे, आबासाहेब शिंदे, आढाव सर यांनी केले आहे.

मुंबई येथे होणाऱ्या फुटबॉलच्या निवड चाचणीसाठी

# सिध्देश्वर देशमुख व कृष्णराज टेमकर रवाना



नगर – महाराष्ट्र स्टेट वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या वतीने १५ वर्षाखालील मुलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सराव शिबिर व निवड चाचणीसाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या निवड समितीने सिध्देश्वर आबासाहेब देशमुख व कृष्णराज गुरुदत्त टेमकर या दोन खेळाडूंची निवड केली आहे.

सोमवार (दि.१५ जुलै) पासून मुंबईत सराव शिबिर व निवड चाचणीला प्रारंभ होणार आहे. या खेळाडूंची निवड जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे राजेंद्र पाटोळे, व्हिक्टर जोसेफ, व जेव्हिअर स्वामी यांनी केली. सिध्देश्वर हा आयकॉन शाळेचा विद्यार्थी असून, इयत्ता नववीत शिकत आहे. त्याला शाळेतील क्रीडा प्रशिक्षक जोनाथन जोसेफ व पल्लवी सैंदाणे यांचे मार्गदशन लाभले. तर कृष्णराज हा आठरे पाटील पब्लिक स्कूलचा इयत्ता नववीचा विद्यार्थी असून, त्याला शाळेचे क्रीडा शिक्षक संदीप दरंदले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या दोन्ही खेळाडूंना पुढील वाटचालीस असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदीया, वरीष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालीद सय्यद, सचिव रौनप फर्नांडीस, सहसचिव प्रदीपकुमार जाधव, खजिनदार राणा परमार, रमेश परदेशी, सय्यद सादीक, रणबीरसिंग परमार, पल्लवी सैंदाणे यांनी शुभेच्छा दिल्या. या शिबिर व निवड चाचणीतून त्यांची महाराष्ट्र संघात निवड झाल्यास रामकृष्ण मिशन आश्रम नारायणपूर (छत्तीसगड) येथे २७ जुलै ते १२ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या फुटबॉल स्पर्धेत ते महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

# सीए परिक्षेत सारडा महाविद्यालयाचे तब्बल १७ विद्यार्थी उत्तीर्ण



सीए फायनल व इंटरमिजिएट परीक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, अजित बोरा, सुमतीलाल कोठारी व प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित. समवेत प्राध्यापक व यशस्वी विद्यार्थी.

नगर – नुकत्याच झालेल्या सीए परीक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयातील तब्बल १७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत सीए पदवी प्राप्त केली आहे. यावर्षी ४ विद्यार्थी सीए फायनल तर १३ विद्यार्थी सीए इंटरमीजीएट परिक्षा उत्तीर्ण होत मोठे यश प्राप्त केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी व प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी सत्कार करून अभिनंदन केले.

यावेळी सीए फायनल परीक्षेत कीर्ती सिंग, प्रथमेश मुनोत, दत्तात्रय पारधी, ऋत्विक रेखी आदींनी यश संपादन केले आहे. तर सीए इंटरमिजिएट परीक्षेत हर्षाली कुलकर्णी, खुशी साहसानी, ओंकार वाबळे, ऋतुजा पटवा, अथर्व बारस्कर, श्रेयस मुळे, ऋचा फाटक, पार्थ बेद्रे, रीत मेहेर, दिनेश बजाज, वैभव मुंगेल, वेद सुवर्णपटकी व संस्कृती कटारीया आदी विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

ॲड.अनंत फडणीस म्हणाले, सारडा महाविद्यालयाचे विद्यार्थी सर्वच क्षेत्रात यशस्वी होत यशाची घोडदौड करत आहेत. सीए परीक्षेत तब्बल १७ विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे संस्थेसाठी मोठे अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांनी असेच यश प्राप्त करत महाविद्यालयाचे नावलौकिक वाढवावे.

सुमतिलाल कोठारी म्हणाले, सीए सारख्या अवघड परीक्षेत सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवत महाविद्यालयाचे नाव जिल्ह्यात उंचावले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशात स्वकष्ट, प्राध्यापकांकडून होणारे योग्य मार्गदर्शन व त्यांना येथे उपलब्ध होणाऱ्या सर्व सुविधांमुळे विद्यार्थी यश प्राप्त करत आहेत.

यावेळी अजित बोरा व प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी उपप्राचार्य मिलिंद देशपांडे व डॉ. मंगल भोसले, प्रबंधक अशोक असेरी, पर्यावेक्षक सुजित कुमावत, राजू रिक्कल व गिरीश पाखरे आदींसह प्राध्यापक व पालक उपस्थित होते.

